संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : २११ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# ‘झुरळां’नी धुव्वा उडवला : धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा

दैनिक
संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
रविवार, दि. २६ जुलै २०२६



## आंदोलनाचा घटनाक्रम

- ३ मे : नीट (NEET) २०२६ ची परीक्षा पार पडली.
- १२ मे : नीटचा पेपर फुटल्याचे उघडकीस आले, परीक्षा रद्द करण्यात आली. लातूरसह देशभरात सीबीआयचे छापे आणि मोठे रॅकेट उघड.
- १५ मे : सरन्यायाधीश सूर्यकांत यांचे "बेरोजगार तरुण हे झुरळासारखे असतात" असे वक्तव्य, देशभरातून तीव्र संताप.
- १६ मे : अभिजित दीपके यांच्याकडून 'कॉकरोच जनता पार्टी'ची (CJP) स्थापना. सोशल मीडियावर तरुणांचा प्रचंड पाठिंबा, CJP चे फॉलोअर्स काँग्रेस-भाजपपेक्षा अधिक झाले.
- १६ मे : पेपरफुटीप्रकरणी सीपीजेकडून केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची अधिकृत मागणी.
- ६ जून : अमेरिकेतून अभिजित दीपके भारतात परतले आणि दिल्लीतील जंतर-मंतरवर आंदोलनाला सुरुवात.
- २८ जून : जंतर-मंतरवर सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांचे आमरण उपोषण सुरू.
- १८ जुलै : पोलिसांनी सोनम वांगचुक यांना जबरदस्तीने सफदरजंग रुग्णालयात दाखल केले.
- २० जुलै : कॉकरोच जनता पार्टीकडून संसदेवर मोर्चाची हाक; हजारो तरुण दिल्लीत दाखल. पोलिसांकडून लाठीमार, देशभरातून निषेध.
- २० जुलै : सरकार आणि CJP यांच्यात पहिली औपचारिक चर्चा, शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यावर विद्यार्थी ठाम.
- २३ जुलै : मेदांता रुग्णालयात सोनम वांगचुक यांनी सोडले उपोषण.
- २४ जुलै : CJP आणि सरकारमधील चर्चेत दोन प्रमुख मागण्या मान्य.
- २५ जुलै : अखेर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा सुपूर्द.

## प्रल्हाद जोशींकडे कार्यभार : जंतर-मंतरवर दीपके म्हणाले : झुकती है दुनिया, झुकानेवाला चाहिए

**मुंबई (दै. संध्या)**

गेल्या अनेक दिवसांपासू कॉकरोच जनता पार्टी म्हणजेच सीजेपीच्या नेतृत्वात दिल्लीच्या जंतर-मंतर मैदानावर आंदोलन सुरू होते. नीट पेपर घोटाळ्याविरोधात हे आंदोलन छेडण्यात आले होते. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना नीट पेपर घोटाळ्यसाठी जबाबदार धरत त्यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी सीजेपीची होती. ही मागणी सरकारने मान्य केली आहे. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्यात आला आहे. सोबतच सीजेपीच्या अन्य दोन मागण्याही मान्य करण्यात आल्या आहेत. दरम्यान, आता सीजेपीचे आंदोलन संपलेले आहे. परंतु या आंदोलनामुळे नेमकं काय बदललं? भारताच्या आगामी काळातील राजकारणात काय बदल होणार? विरोधकांना याचा नेमका काय फायदा होणार? भाजपाला काय फटका बसू शकतो?

कॉकरोच जनता पार्टीचे हे आंदोलन देशातील लाखो तरुणांनी आपल्या हातात घेतले होते. देशभरातून वेगवेगळ्या शहरात तरुण एकवटलेले दिसले. विशेष म्हणजे जमेल त्या मार्गाने देशातील जेन झी दिल्लीच्या जंतर मंतर मैदानावर जमा झाले. सोनम वांगचूक उपोषणाला



धर्मेंद्र प्रधान

बसलेले असताना सुरुवातीच्या दिवसात या आंदोलनाला म्हणावा तेवढा प्रतिसाद नव्हता. परंतु 20 जुलै रोजी पोलिसांनी संसद मार्चवर केलेला लाठीचार्ज तरुणांना एकत्र येण्यास कारणीभूत ठरला. म्हणूनच हजारो तरुण दिल्लीत जमा झाले. या आंदोलनामुळे देशातील तरुणांमध्ये किती ताकद आहे? हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. तरुण एकत्र आले तर सत्तेला हादरा बसू शकतो, भविष्यात कदाचित सत्तांतरही होऊ शकते, असा संदेश आता भारतातील कोट्यवधी जनतेला गेला आहे. त्यामुळेच सत्ताधारी भाजपाला तरुणांना, तरुणांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवूनच पुढील राजकारण करावे लागणार आहे. तरुणांकडे दुर्लक्ष करणं कदाचित भविष्यात सत्ताधारी भाजपाला धोकादायक ठरू शकतं. विरोधकांच्या मागण्या काय आहेत, या तरुण पिढीला काय हवं आहे, या गोष्टी लक्षात घेऊनच आता सत्ताधारी तसेच विरोधकांना आपले राजकीय डावपेच आखावे लागतील. गेल्या साधारण 12 वर्षांमध्ये पहिल्यांदाच केंद्रातील मोदी सरकारला आपल्या मंत्रिमंडळातील नेत्याचा राजीनामा घेण्याची नामुष्की ओढावली आहे. या आंदोलनात काँग्रेस तसेच इंडिया आघाडीतील इतरही घटकपक्षांनी संसद दणाणून सोडली. सीजेपीचे आंदोलन आणि त्यांच्या मागण्या विरोधकांनी लावून धरल्या. पुढे लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानापुढे केलेले ठिय्या आंदोलन, गांधी स्मृती भवनात जाऊन गायलेले राष्टगीत यामुळेही विरोधकांची ताकद दिसली. विरोधकांनी एकवटून विरोध केल्यामुळे मोदी सरकारवर एका प्रकारे दबाव वाढला. हे संपूर्ण आंदोलन सीजेपीचे असले तरीही यामुळे विरोधकांमध्ये मात्र नवचैतन्य निर्माण झाले आहे. सीजेपीने विरोधकांमध्येही संजीवनी पेरली आहे.

सलग तिसऱ्यांदा सत्तेत असलेलं मोदी सरकार हे विकासाचा दुसरा चेहरा आहे, असा दावा भाजपाकडून केला जातो. भारताला आम्हाला विकसित भारत बनवायचं आहे, असंही सत्ताधाऱ्यांकडून सांगितलं जातं. परंतु सध्याच्या सीजेपी आंदोलनामुळे तरुणांच्या मनात काय आहे? हे समोर आलं आहे. तरुणांचे प्रश्न काय आहेत? त्यांच्या शिक्षणाच्या, नोकरीच्या समस्या किती गंभीर आहेत याचीही एका प्रकारे प्रचिती आली. म्हणूनच तरुणांच्या आणि विरोधकांच्या वाढत्या रेट्यामुळे तब्बल 12 वर्षांतून पहिल्यांदाच दबावापोटी मोदी यांना आपल्याच मंत्र्याचा राजीनामा घ्यावा लागला. मोदी सरकार तसेच भाजपासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. या आंदोलनामुळे तसेच प्रधान यांच्या राजीनाम्यामुळे सत्ताधारी भाजपा बॅकफुटवर गेल्याचे बोलले जातेय. सध्या समोर आलेला हा असंतोष शमवण्यासाठी आता भाजपाला काम करावे लागणार आहे. तरुणांचा राग शांत करून त्यांना पुन्हा एकदा भाजपाकडे वळवण्याचे शिवधनुष्य आता भाजपाला पेलावे लागणार आहे. त्यानुसारच भाजपाला आपली रणनीती आता भविष्यात आखावी लागेल.

सध्या सलग तिसऱ्यांदा मोदी सत्तेत आहेत. आता पुन्हा एकदा सत्तेत यायचे असेल तर मोदी यांना तरुणांच्या या असंतोषाला केंद्रस्थानी ठेवूनच काम करावे लागेल. तर विरोधकांना तरुणांच्या या असंतोषाला वाट करून सत्तेची चावी शोधावी लागणार आहे. त्यामुळे 2029 सालची निवडणूक कदाचित तरुणांना केंद्रस्थानी ठेवूनच लढवली जाऊ शकते. 2014 सालची निवडणूक ही भ्रष्टाचाराविरोधात होती. 2019 तसेच 2024 सालची निवडणूकही विकासाच्या मुद्द्यावर लढवली गेली. पण आता 2029 सालची निवडणूक ही तरुण आणि तरुणांचे भवितव्य याच मुद्द्यावर कदाचित लढवली जाऊ शकते. त्यासाठी काँग्रेसने अगोदरपासूनच तयारी चालू केली आहे. राहुल गांधी हे तरुणांच्या कायम संपर्कात राहण्याचा प्रयत्न करतात.

तर दुसरीकडे या आंदोलनानंतर आता मोदी यांनीदेखील आपल्या नेत्यांना, मंत्र्यांना इन्स्टाग्रामसारख्या माध्यमावर सक्रीय राहण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे आता 2029 सालची निवडणूक ही तरुणांची असं म्हणायला हककत नाही. सोबतच सीजेपी भविष्यात राजकारणात उतरलीच तर राजकारणाचे चित्रही कदाचित वेगळे असू शकते. त्यामुळे भविष्यात काय होणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा पंतप्रधानांनी स्वीकारला


धर्मेंद्र प्रधान यांनी त्यांच्या पदाचा दिलेला राजीनामा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अखेर स्वीकारला आहे. नीट पेपर फुटीप्रकरणी आणि ढिसाळ शिक्षण व्यवस्थेविरोधात दिल्लीच्या जंतर-मंतरपासून ते पाटण्यापर्यंत हजारो विद्यार्थ्यांनी पुकारलेल्या तीव्र आंदोलनानंतर पंतप्रधान मोदींनी हे मोठे पाऊल उचलले आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी शनिवारी दुपारी या संपूर्ण प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारत आपला राजीनामा पंतप्रधानांकडे सुपूर्द केला होता. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर शिक्षणखात्याचा प्रदभार आता प्रल्हाद जोशी यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी शिक्षणमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनीही तब्बल 26 दिवस उपोषण केले होते. सरकारच्या आश्वासनानंतर त्यांनी उपोषण मागे घेतले होते.

### जंतर-मंतरवर जल्लोष

धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा मंजूर झाल्याची बातमी येताच 'कॉकरोच जनता पार्टी' आणि विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. दिल्लीतील जंतर-मंतरवर तरुण ढोल-ताशे वाजवत नाचताना आणि विजयोत्सव साजरा करताना दिसले. शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याव्यतिरिक्त सीजेपीच्या इतरही प्रमुख मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत, ज्यामध्ये पीडित कुटुंबांना नुकसान भरपाई देण्याचा समावेश आहे. 20 जुलै रोजी दिल्लीत संसदेवर काढण्यात आलेल्या मोर्चावर पोलिसांनी केलेल्या लाठीमारानंतर या आंदोलनाला हिंसक वळण लागले होते आणि सरकार पूर्णपणे बॅकफुटवर आले होते. अखेर पंतप्रधान मोदींनी स्वतः मध्यस्थी करत विद्यार्थ्यांच्या मागण्या रास्त असल्याचे सांगत दिलासा दिला.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

### ढिंग-टांग




## आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्र्यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा

# पंढरपूर कॉरिडॉरचे काम कोणावरही अन्याय न करता योग्य पुनर्वसन करून पूर्ण करणार : मुख्यमंत्री

**पंढरपूर (दै. संध्या)**

श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी दरवर्षी वाढणारी भक्तांची गर्दी पाहता त्यांना उत्तम सोयी उपलब्ध करून देण्यासाठी मंदिर परिसर विकासाचे काम पंढरपूर कॉरिडॉरच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. कोणावरही अन्याय न करता सर्वांचे योग्य पुनर्वसन करून हे काम येत्या अडीच वर्षांत पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

आषाढी शुद्ध एकादशी निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक तसेच मानाचे वारकरी बाबासाहेब माधव माने, प्रभावती बाबासाहेब माने या दाम्पत्यासमवेत केली. त्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने झालेल्या सत्कारप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, अमृता



फडणवीस, आमदार समाधान आवताडे, राजेंद्र राऊत, सुरेश खाडे, बापूसाहेब पठारे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.

मागील काळात सुरू केलेले मंदिर विकासाचे काम बहुतांश पूर्ण झाले असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, “पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी लाखो लोक येतात. येथे अत्यंत कमी जागा आहे. आता मोठी जागा तयार करणे गरजेचे आहे. यावर्षी हे काम सुरू करायचे आहे. कॉरिडॉर विकासात येथील व्यावसायिकांचा व्यवसाय वाढेल, नागरिकांना घरे मिळतील, भाडेकरूंची व्यवस्था होईल, अशा पद्धतीने त्याची रचना करण्यात आली आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर कितीही भाविक आले तरी अतिशय उत्तम व्यवस्था या ठिकाणी होईल.” मुख्यमंत्री पुढे म्हणाले, “यावेळी वारीने एक नवा उच्चांक गाठला आहे. यावर्षी २५ किलोमीटरपेक्षा जास्त लांबीची दर्शनासाठी रांग लागली होती. परंतु दर्शनासाठी २५ तास लागले तरीही कोणीही नाराज न होता, न थकता त्या ठिकाणी आनंदाने विठ्ठल नामाचा गजर करत हे दर्शन घेत आहेत. चंद्रभागेचे पाणी स्वच्छ राहील याची काळजी घेण्यात आली आहे. यावेळी पालकमंत्र्यांनी वाळवंटात अतिशय सुंदर व्यवस्था केल्यामुळे तिथला कचरा, विष्ठा आदी संपूर्ण स्वच्छता झाली आहे. त्यामुळे अतिशय सुंदर वाळवंट आपल्याला पुन्हा एकदा पाहायला मिळत आहे. आपण सर्वजण करत असलेली सेवा श्री विठ्ठल स्वीकारतील आणि त्यांचा आशीर्वाद आपल्या सर्वांना सदैव मिळेल, अशी प्रार्थना मी त्यांच्या चरणी करतो.”

## प्रधान भ्रष्टाचाराचे प्रतीक, त्यांना जावेच लागणार होते : राहुल गांधी

**नवी दिल्ली (दै. संध्या)**

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर माध्यमांशी बोलताना सांगितले - प्रधान यांना जावेच लागणार होते. चांगले झाले ते गेले. ते भ्रष्टाचाराचे प्रतीक आहेत. देशाची शिक्षण व्यवस्था पोखरली गेली आहे. यात जेवढी चूक पंतप्रधानांची आहे, तेवढीच RSS ची आहे. यापूर्वी दिवसाही त्यांनी पेपरफुटीच्या मुद्द्यावर पत्रकार परिषद घेतली होती. ते म्हणाले होते, ‘शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पदावरून हटवावेच लागेल. सरकार त्यांचा विभाग बदलण्याचा विचार करत आहे, पण हे मान्य नाही.’



राहुल गांधी म्हणाले, ‘नरेंद्र मोदींना तरुणांची माफी मागावीच लागेल. ते भारताचे भूतकाळ आहेत आणि भूतकाळ कधीही भविष्याशी लढू शकत नाही.’

त्यांच्यासोबत डाव्या संघटना AISA च्या विद्यार्थिनीही होत्या. तिघींनी जंतर-मंतरवर 23 दिवसांचे उपोषण केले होते. यापूर्वी राहुल यांनी शुक्रवारीही पत्रकार परिषद घेतली होती. यात 20 जुलैच्या विद्यार्थी आंदोलनात जखमी झालेल्या एका तरुणाला ते सोबत घेऊन आले होते. राहुल यांनी पुन्हा 3 मागण्यांचा पुनरुच्चार केला, म्हणाले- यावर कोणतीही तडजोड नाही

राहुल म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या 3 मागण्या आहेत. या तिन्हीवर कोणतीही तडजोड होणार नाही.

पहिली- विद्यार्थ्यांची मागणी स्पष्ट आहे की धर्मेंद्र प्रधान यांना पदावरून हटवावे.

दुसरी- विद्यार्थ्यांवर कारवाई करणाऱ्या दिल्ली पोलिसांच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी. विद्यार्थ्यांविरोधात पेलेट गनचा वापर करण्यात आला. तिसरी- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांवर झालेल्या हल्ल्याबद्दल माफी मागावी. राहुल यांनी जवळ उभ्या असलेल्या विद्यार्थ्यांना सांगितले की, त्यांना त्यांचा अभिमान आहे. हे विद्यार्थी घाबरणारे नाहीत आणि ते देशाच्या भविष्याचे प्रतिनिधित्व करतात. ते आपल्या शिक्षण प्रणालीच्या ढासळण्याचे प्रतीक आहेत. त्यांना जावेच लागेल. त्यांच्यामुळेच हजारो लोक रस्त्यावर आहेत.’ त्यांनी विद्यार्थ्यांच्या हात, पाठ आणि छातीवरील जखमा दाखवल्या.

# संपादकीय

## दोन आंदोलने

सामाजिक व्याप्ती हा दोन्ही आंदोलनांतील आणखी एक महत्त्वाचा फरक. अण्णा आंदोलनानं भ्रष्टाचार हा जणू प्रत्येक नागरिकाचा प्रश्न बनवला होता. सध्याचं आंदोलन शिक्षण, परीक्षा, रोजगार, पर्यावरण किंवा विशिष्ट धोरणांशी संबंधित प्रश्नांपासून सुरू झालं.

दिल्लीच्या जंतर मंतरवर कधीही गेलं तरी, 'गांधीजी का जंतर' हा प्रसिद्ध वाक्प्रचार आठवतो. अण्णा हजारे आंदोलनानंतरचं एक मोठं आंदोलन सध्या इथं सुरू आहे ते 'नीट' पेपरफुटीवरून शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी, कॉक्रोच जनता पक्षाचे (सीजेपी) अभिजित दीपके व सहकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली. हे आंदोलन आता अखेरच्या टप्प्यात आल्याची चाहूल लागली. अशा वेळी इथं रात्रीच्या वेळी गेलं की, जंतरमंतरचं वेगळंच रूप दिसतं. गेले ३५ दिवस जंतरमंतरवरच्या गर्दीची रात्रीची झोप हरवली आहे. पिवळट प्रकाश सांडणाऱ्या दिव्यांच्या आडून छद्मीपणे डोकावणारा अंधार असला तरी हजारो तरुणांच्या डोळ्यांत आशेचा उजेड पेटलेला असतो. कुणाच्या हातांतला तिरंगा हवेवर फडकत असतो, कोणाच्या हातात फलक. गर्दीच्या ओठांवर घोषणांचा अखंड नाद... पोलिसांचे जत्थे बॅरिकेड्सच्या मागून बारकाईने गर्दीकडे पाहत असतात. रात्री साडेबारा, दोन, तीन आणि चार वाजतात; पण आंदोलनाची धग कायम असते. बाजूच्या पदपथांवर विश्रांती घेणारे आणि मंचासमोर घोषणा देणारे कार्यकर्ते हे चित्र लोकशाहीतल्या जनआंदोलनाचं वेगळं रूप. पहाटेची आभा पसरत असताना पोलिस, निमलष्करी जवानांची संख्या वाढत जाते, दंगाविरोधी पोलिसी वाहनांचा गराडा पडतो. हेल्मेटधारी जवान आपापल्या जागा घेतात आणि जंतरमंतरचं रूप एका सुरक्षाकवचात अडकलेल्या आंदोलनस्थळात बदलतं. सुरक्षा कडक होत चालली, निशस्त्र विद्यार्थ्यांवर लाठ्याकाठ्या चालल्या, व्यवस्थेनं मेट्रो स्थानकं एकामागून एक बंद करून पाहिली, काही समाजकंटक प्रवृत्तींनी याआडून हात साफ करून घेण्याचे प्रयत्न चालवलेत. 'सीजेपी'च्या या आंदोलनात जेव्हा जेव्हा जंतरमंतरवरचं दृश्य पाहिलं, तेव्हा तेव्हा मनात पंधरा वर्षांपूर्वीच्या अण्णा हजारे यांच्या आंदोलनाच्या आठवणी जाग्या झाल्या. त्या आंदोलनाचंही वार्तांकन करण्याचा अनुभव आगळावेगळाच होता. जंतर मंतर आणि रामलीला मैदान या दोन्ही ठिकाणी तेव्हा देशभरातून आलेल्या जनसमुदायाने भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवला होता. २०११ मध्ये अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखालचं आंदोलन मुख्यतः भ्रष्टाचाराविरोधातील नैतिक लढा म्हणून उभे राहिलं होतं. तेव्हाचं यूपीए सरकार अगदीच घायकुतीला आलं होतं आणि राष्ट्रकुल क्रीडास्पर्धा घोटाळा, २जी स्पेक्ट्रम प्रकरण, आदर्श घोटाळा यांमुळे तरुणांच्या मनात संताप होता. 'महापुरे झाडे जाती,.. 'अशी मराठीमिश्रित हिंदी बिनदिक्कत बोलणाऱ्या अण्णांचं साधं व्यक्तिमत्त्व आणि गांधीवादी उपोषणानं जनतेच्या मनातल्या त्या संतापाला दिशा दिली. सध्याच्या आंदोलनात उत्साह आहे, पण एक अस्वस्थताही आहे. हजारो पोलिस, बॅरिकेड्स, सीसीटीव्ही, निमलष्करी दलांचा बंदोबस्त आणि निर्बंध यांमुळे आंदोलनाचे स्वरूप अधिक संघर्षमय आहे. संवादापेक्षा करकचून नियंत्रणाला अधिक महत्त्व दिल्याची जी भावना आंदोलकांमध्ये दिसते, ती आपल्यालाही जाणवते. सामाजिक व्याप्ती हा दोन्ही आंदोलनांतील आणखी एक महत्त्वाचा फरक. अण्णा आंदोलनानं भ्रष्टाचार हा जणू प्रत्येक नागरिकाचा प्रश्न बनवला होता. त्याआधी जणू देशात भ्रष्टाचार झालाच नव्हता, असं काहीतरी लोकांना वाटत असावं. सध्याचं आंदोलन शिक्षण, परीक्षा, रोजगार, पर्यावरण किंवा विशिष्ट धोरणांशी संबंधित प्रश्नांपासून सुरू झालं व नंतर त्यात इतर मुद्दे जोडले गेले. त्यामुळे त्याला सहानुभूती मोठ्या प्रमाणात मिळाली असली, तरी २०११ सारखी सर्वसमावेशक राष्ट्रीय लाट निर्माण करण्याची ताकद यात नाही. २०११मध्ये सरकारविरोधी सर्वव्यापी संताप स्पष्ट जाणवत होता, सध्या त्या प्रमाणात तशी भावना नाही. मुळात या आंदोलनाला सध्याच्या सरकारनं परवानगी दिलीच कशी, हा प्रश्न सूज्ञांना पडला नाही तर देव त्यांचं रक्षण करो! अर्थात टोकाचा व्यक्तिद्वेष असेल तर बोलणंच खुंटलं. मात्र, तरुणांचा मोठा सहभाग ही एक गोष्ट दोन्ही आंदोलनांना समान धाग्याने जोडते. विदेशी माध्यमांत प्रसिद्धी पण ताज्या आंदोलनावर बहुतांश राष्ट्रीय प्रमुख प्रसार माध्यमांचा अघोषित बहिष्कार,असं चित्र असलं तरी जंतरमंतरवर रात्ररात्र जागणारे, सोशल मीडियावर थेट प्रक्षेपणाच्या व संघटनात्मक जबाबदाऱ्या सांभाळणारे बहुसंख्य युवकच आहेत.

## संस्कृत सुभाषित

व्यसनानन्तरं सौख्यं स्वल्पमप्याधिकं
भवेत्।कषायरसमाद्याय स्वाद्वतीवाम्बु विद्यते ।।

अर्थ : संकटे येऊन गेल्यानंतर जे थोडेफार सुख मिळते, ते खूपच अधिक वाटते. प्रथम आवळ्याची चव तुरट भासते पण त्यावर पाणी प्याल्यावर ते मात्र गोड लागते.

## गुरु वचन

### इतरांचेही दु:ख पहा

एकदा एका झाडाखाली सशांनी आपली एक तातडीची सभा बोलावली. सर्वच ससे दु:खी आणि घाबरलेले होते. एक ससा उभा राहून म्हणाला, ''मित्रहो, आपलं जीवन फारच दु:खी आहे आणि या दु:खातून आपली सुटका होणे कधीही शक्य नाही. आपल्याला मनुष्य, कुत्रा, गरूड आणि इतरही अनेक लहान मोठ्या प्राण्यांपासून धोका आहे. तेव्हा आपण सर्वचजण एखाद्या तलावात जाऊन जीवन देऊया.

जिवंतपणी या अनंत यातना भोगण्यापेक्षा मरण परवडले. शिवाय आपण एकत्र मरू. म्हणजे दुसऱ्याच्या मरणाचे दु:खही करायला नको.'' त्या सशाचे बोलणे सर्व सशांना पटले. त्या सर्वांनी एकाच वेळी प्राणत्याग करण्याचे ठरवले. प्राणत्याग करण्याचा दिवसही ठरविला गेला.

ठरलेल्या दिवशी सर्व ससे आपल्या कुटंबातील लहानथोरांसह एकत्र जमले. थोड्याच वेळात सशांचा एक मोठा समूह तळ्याकाठी आला. त्या तळ्याकाठच्या चिखलात बरेच लहानमोठे बेडूक खेळत होते. सशांना पाहून ते घाबरले आणि त्यांनी भराभर तळ्यात उड्या टाकल्या. ते पाहून एक हुशार ससा म्हणाला,

''मित्रांनो, थांबा. घाई करू नका. आता तुम्ही पाहिलंत ना. आपल्याला घाबरणारे प्राणीही या जगात आहेत. त्यांचं दु:ख आपल्यापेक्षाही मोठं आहे. तरीही ते हिंमत बाळगून जगताहेत ना मग आपण कशाला दु:खी आणि निराश व्हायचं! या प्राण्यांपेक्षा आपण सुखी आहोत.

तेव्हा आपल्यापेक्षा सुखी प्राण्यांकडे न पहाता दु:खी प्राण्यांकडे पाहून आपण जगायला हवे. म्हणजे आपले दु:ख आपल्याला जाणवणार नाही. तेव्हा चला आता आपआपल्या घरी आणि आनंदाने जगा.'' त्या सशाचे बोलणे सर्वांनाच पटले. आनंदाने उड्या मारीत ते आपापल्या घरी परतले.

## उपदेशकथा

### गुरूचे महात्म्य

एकदा एका शिष्याने श्रीरामकृष्ण परमहंसांना विचारले, 'महाराज, गुरूचे कार्य शिष्याच्या जीवनात काय असते? गुरूपासून कोणता लाभ त्या शिष्याला मिळतो.?' श्रीरामकृष्ण परमहंस हे व्यवहारातला दाखला देऊन सोपे उदाहरण देऊन उपदेश करण्यात अत्यंत चतुर होते. रामकृष्ण म्हणाले, 'ती समोर समुद्रावर होडी दिसत आहे ना, ती कलकत्त्याला पोहोचवयास किती तास लागतील?' शिष्याने थोडा वेळ विचार करून उत्तर दिले, 'महाराज, त्या होडीला कलकत्त्याला पोहोचण्यास चार तास लागतील.' आता असे पाहा. रामकृष्ण पुढे सांगू लागले, पलीकडे जी बोट दिसते आहे त्या बोटीला ही होडी लावली तर किती वेळात ही होडी कलकत्त्याला पोहोचेल?' शिष्याने उत्तर दिले, 'महाराज, तर मग ती अर्ध्या तासातच पोहोचेल.' रामकृष्ण म्हणाले, 'गुरुची महती अशीच आहे. शिष्याला वर्षानुवर्षे खडतर साधना करावी लागते. ती गुरूच्या प्रसादाने सहज व चटकन होते. गुरू हा ज्ञानाने प्राप्त झालेले चातुर्य व संपन्न व्यक्तिमत्व यांचा प्रतिनिधी आहे.

कथा उपदेश : गुरूमहिमा अगाध आहे. संसार सागर पार करण्यास गुरूसारखे दैवत नाही.

## पंचांग

| पंचांग | योग:ऐन्द्र २२:०४:२९ |
|---|---|
| २६जुलै २०२६ | करण:बालव १३:५८:०६ |
| रविवार | करण:कौलव |
| विक्रम संवत्– २०८२ | २७:०७:५४+ |
| आषाढ संवत्– १९४८ | सूर्य:कर्क |
| संवत्सर – पराभवनाम | चन्द्र:धनु०७:३४:२६ |
| अयन– दक्षिणयन | हिजरी सन् – १४४८ |
| मास– आषाढ | मुस्लिम मास – सफर |
| ऋतु– सौर वर्षा | तारीख – ११ |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:द्वादशी १३:५८:०६ | वामन पूजन |
| नक्षत्र:ज्येष्ठा ०७:३४:२६ | प्रदोष |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०२१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 9 | | 7 | 8 | | |
| | 8 | | 4 | 1 | | | 7 | 3 |
| | 3 | 1 | | | 8 | | | 4 |
| | 6 | | | 8 | 4 | | | 9 |
| | | | 2 | 6 | 3 | | | |
| 8 | | | 1 | 5 | | | 3 | |
| 2 | | | 3 | | | 4 | 1 | |
| 9 | 5 | | | 7 | 1 | | 8 | |
| | | 3 | 8 | | 2 | | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०२० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 4 | 8 | 6 | 1 | 7 | 3 | 9 | 5 |
| 3 | 1 | 9 | 2 | 5 | 8 | 6 | 4 | 7 |
| 5 | 6 | 7 | 3 | 4 | 9 | 8 | 2 | 1 |
| 1 | 8 | 5 | 4 | 9 | 6 | 7 | 3 | 2 |
| 9 | 2 | 4 | 7 | 3 | 1 | 5 | 8 | 6 |
| 6 | 7 | 3 | 5 | 8 | 2 | 4 | 1 | 9 |
| 7 | 9 | 2 | 8 | 6 | 4 | 1 | 5 | 3 |
| 4 | 5 | 1 | 9 | 7 | 3 | 2 | 6 | 8 |
| 8 | 3 | 6 | 1 | 2 | 5 | 9 | 7 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ११३९ – अफोन्सो पहिला पोर्तुगालच्या राजेपदी.
- १७८८ – न्यूयॉर्कने अमेरिकेचे संविधान मान्य केले व त्यायोगे अमेरिकेचे ११वे राज्य झाले.
- १८४७ – लायबेरियाला स्वातंत्र्य.
- १९३६ – जर्मनी व इतर मित्र देशांचा स्पॅनिश गृहयुद्धात हस्तक्षेप.
- १९४१ – दुसरे महायुद्ध – जपानच्या नैऋत्य एशियातील शिरकावास प्रत्युत्तर म्हणून अमेरिकन राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डिलानो रूझवेल्टने अमेरिकेतील जपानी मालमत्ता सरकारी ताब्यात घेण्याचा आदेश दिला.

### राष्ट्रीय

- १९६५ – मालदीवला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य.
- २००२ – तत्कालीन संसद सदस्या फुलनदेवीची गोळ्या घालून दिल्लीत हत्या.

### जन्म

- १०३० – संत स्टानिस्लॉ.
- १६७८ – जोसेफ पहिला, पवित्र रोमन सम्राट.
- १८०२ – मेरियानो अरिस्ता मेक्सिकोचा राष्ट्राध्यक्ष.
- १८५६ – जॉर्ज बर्नार्ड शॉ, आयरिश लेखक.
- १८५८ – टॉम गॅरेट ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १८७५ – कार्ल युंग, स्विस मनोवैज्ञानिक.
- १९०८ – साल्व्हादोर अलेंदे चिलीचा राष्ट्राध्यक्ष.

### निधन

- ७९६ – ऑफा, मर्शियाचा राजा.
- ८११ – निसेफोरस, बायझेन्टाईन सम्राट.
- १३८० – कोम्यो, जपानी सम्राट.
- १४७१ – पोप पॉल दुसरा.
- १८४३ – सॅम ह्युस्टन, टेक्सासच्या प्रजासत्ताकचा राष्ट्राध्यक्ष.
- १८६७ – ओट्टो, ग्रीसचा राजा.

## : SMS :

Main: Main kisi ke liye special hu kya?

Dost: Haan... "Ignore list" me sabse upar

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.४ | २३.९ |
| अहमदनगर | २९.७ | २३.६ |
| अकोला | ३७.७ | २६ |
| अमरावती | ३६.७ | २५.३ |
| बीड | ३९.६ | २६.४ |
| भंडारा | ३६.२ | २५.६ |
| बुलढाणा | ४१.१ | २७.३ |
| चंद्रपूर | ३८.८ | २६.७ |
| चेन्नई | ४२.२ | ३०.६ |
| नवी दिल्ली | ३९.३ | ३०.८ |
| धुळे | ३४.८ | २६.१ |
| गोंदिया | ३५ | २५.७ |
| जळगाव | ३६.५ | २५.३ |
| कोल्हापूर | २९.२ | २३.६ |
| लातूर | ३२.३ | २४ |
| मुंबई | ३४.७ | ३२.२ |
| नागपूर | ३६.३ | २५.६ |
| नांदेड | ३७.३ | २५.८ |
| नंदूरबार | २७.२ | २५.२ |
| नाशिक | २६.६ | २४.३ |
| पुणे | २५.९ | २२.९ |
| पंढरपूर | ३४.३ | २४.५ |
| सातारा | ३०.१ | २३.७ |
| सांगली | ३१.१ | २३.८ |
| सोलापूर | ३४.७ | २४.३ |
| वर्धा | ३८.७ | २५.५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण कामामध्ये यश न मिळाल्याने निराशा येईल. मदतीची अपेक्षा करू नका.

**तुळ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व मान सन्मान वाढणार आहे. कार्यात येणारे विघ्न दूर होतील.

**वृषभ :** शुभ रंग:लाल,शुभ दिशा:उत्तर शुभ कार्याला सुरूवात करण्याचे योग आहेत. मनस्थिती चंचल होऊ देऊ नका.

**वृश्चिक :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: उत्तर फायदेशीर प्रेरणा मिळणार आहे. शुभ कार्यात सामील होण्याचा योग आहे. आर्थिक खर्च वाढणार आहे.

**मिथुन :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व महत्वाची कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. एखाद्या व्यक्तीच्या सहवासामुळे जीवनात बदल घडून येईल.

**धनु :** शुभ रंग:पिवळा,शुभ दिशा:दक्षिण शुभ बातम्या कळाल्यामुळे दिवस चांगला जाईल. राजकारणापासून दूर रहा.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण समाजात आपल्या कामाची स्तुती होईल. धार्मिक कामाकडील ओढा वाढेल. ओळखीचा फायदा होईल.

**मकर :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर आपण केलेल्या कार्यामुळे स्वत:ला फायदा होईलच त्या बरोबर समाजाचा देखील फायदा होईल.


**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर मित्रांच्या सहकार्याने फायदा होईल. स्थावर प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने राहील.

**कुंभ :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पूर्व सामान्य स्तरावरची कामे होतील. योजना सफल राहतील. समाजात यश आणि प्रतिष्ठा वाढेल.

**कन्या :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर अचानक यश मिळाल्याने मन प्रसन्न राहील. कौटुंबिक समस्या हल होतील.

**मीन :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व कामामध्ये यश न आल्यामुळे आपल्याला चिंता सतावेल. भाऊ, मित्र यांच्या बोलण्यामुळे मन दुखावेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०२१



### आडवे शब्द

१. सर्वश्रेष्ठ धर्म
४. या दगडाला मलमलीची उपमा दिली जाते
८. बाराखडीच्या पुस्ताकातच भेटणारा प्राणी
१०. सम
१२. पाण्याचे हवेत रूपांतर
१५. भांडवलशाहीतील प्रमुख घटक
१८. जयपराजय
१९. डोंगरावरून सतत पडणारा पाण्याचा प्रवाह
२०. मान्यतापत्र, अधिकारपत्र
२१. पूर्णपणे
२३. जळलेले पीक
२४. बुजरा
२६. दिशादर्शक यंत्र
२७. सतत नकार ऐकवणारे वाद्य
३०. कणीदार
३१. पहिला ऋतू
३२. सकस, सत्वयुक्त
३४. जोधळ्याची एक जात
३६. हिंदीतील पण
३८. व्यवस्थित
३९. शिक्षक
४०. दृश्य
४१. दात असताना दुर्मिळ असणारे धान्य
४२. ओशाळलेला
४३. पाणी
४४. एखाद्याची कड घेणे
४५. ताक
४६. सैन्यातील शिपाई
४७. याने कांदे सोलता येतात?
४८. संपूर्ण
४९. साधना
५०. इतर, दुसरे
५१. साठ मिनिटे
५३. संकट आणणारे शस्त्र
५४. आमंत्रक
५५. उत्कर्ष, प्रगती
५७. संध्याकाळ
५९. बाजेची कापडी पट्टी
६२. तृण
६३. निरुपयोगी लोकांची भरती
६५. मौज
६७. आदिमाया
६८. नुकतेच सरलेले दिवस
६९. जेमतेम, मोठ्या मुश्किलीने
७१. निस्तरता न येणारी साडी किंवा भानगड
७२. पद्धत

### उभे शब्द

१. तप्त होणारा डोक्याचा भाग
२. व्रत
३. भांबावलेला
५. गणपती
६. होकार, संमती
७. रत्नांची माळ
८. मिळून येणे
९. लबाडीचा हेतू
११. हा प्राणी राम ायणकाळातही होता म्हणतात
१३. न जाणो याच्या उच्चाराने ब्रह्महत्या व्हायची!
१४. आकाश
१६. विशेष
१७. 'नकोसा' नवरा
१९. धमकी, तंबी
२१. मर्यादा
२२. संध्याकाळ
२५. सुकामेव्यातील एक फळ
२७. लीन
२८. अर्धा 'र'
२९. एक क्षार
३३. नारळाचे झाड
३४. संकट दूर करणारा
३५. आश्वासन
३७. मगज
३८. कोथिंबीरीचे बी
३९. कैफी, नशा अणणारा
४०. मंदिर
४१. चाक
४२. साडेसातीचा ग्रह
४३. द्वाड, खोडकर
४४. कित्येक
४५. सूर्य
४६. युद्धजन्य स्थितीत मोठ्या प्रमाणावर राबवली जाणारी लष्करी मोहीम
४८. सोददित
४९. तमाशातील कलाकार
५१. चांदणी
५२. सटवाई
५३. हत्तीची चाल
५६. पुष्कळ
५८. गतकाल
५९. आकाश
६०. माळकरी
६१. रबरी चपला
६३. झोपडी
६४. पाठवलेला
६६. झाडाझडती
७०. मलई

### जम्बो शब्दकोडे क्र. १०२० चे उत्तर

आडवे उत्तर : १.छाना २अ.बेभान ५.पथकर ८.वसवस ११.कट १२.जरतर १४.सामानसुमान १५.टाकला १७.लकवा १९.रास २१.लवाद २३.वारदार २४.मांजर २५.अस्त २६.सरकार २८.नीरजा ३१.मस ३३.समरस ३४.खत ३५.सारजा ३६.समाचार ३७.वात ३८.कलह ४०.नशा ४२.दाढी ४३.नवरस ४५.वातड ४६.किन्नर ४७.पीर ४८.नाक ४९.मौज ५०.खानसामा ५३.कलकल ५४. मानधन ५६.खनन ५८.तनया ६०.दादर ६२.रदन ६४.तगडा ६७.रया ६८.वानर ७०.अनारकली ७२.वाजतगाजत ७४.तीखा ७५.वासरू ७७.सजा ७८.गजरा ८०.नाद ८२.सरळसोट ८३.मनकवडा ८४.तर्री

उभे उत्तर : १.छाकटा २.नरम ३.भाजणी ४.नर ५.परकर ६.कसा ७.रमावर ८.वसुधा ९.समा १०.वनराज १३.तलवार १६.ताल १८.वासर २०.सरबत २२.वास २४.मांजा २५.अचानक २७.कास २८.नीरद २९.रस ३०.वसाहत ३२.कमालकिमान ३३.सरदार ३४.खतरनाक ३७.वाव ३९.लवाजमा ४१.शासन ४३.नरकयातना ४४.सकल ५०.खानदान ५१.साखर ५२.पतन ५५.नफा ५७.नर ५९.अरण्यवास ६१.दरवाजा ६३.दहेज ६५.गरती ६६.डाकखाना ६९.मतदान ७१.वारूळ ७३.तगडा ७६.सर ७७.सट ७९.रात ८१.दरी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



## सिंचन आणि बीडीपी झोनमधील जागा क्रीडांगणासाठी : मंत्री चंद्रकांत पाटील

**पुणे : दैनिक संध्या**

खेळांसाठी मैदान शोधण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यामुळे खेळाचे आरक्षण असलेली ठिकाणे शोधावी लागतील. अनेक ठिकाणी सिंचन आणि बीडीपी झोनमधील जागा पडून आहेत. त्यावर इमारतीच्या माध्यमातून विकास करायचा नाही तर या सिंचन आणि बीडीपी झोनमधील जागा क्रीडांगणासाठी वापरता येतील. पालकांनी खेळांकडे मुलांचे करिअर म्हणून बघायला हवे. सन्मित्र संघाकरिता पूरक असे संकुल डिसेंबर २०२६ पर्यंत करूया, असे आश्वासन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. सन्मित्र संघ, पुणे शतकपूर्ती विशेष कार्यक्रम च्या निमित्ताने '१०० खेळाडूंच्या प्रशिक्षण संकल्पाचे पूर्णत्व' आणि स्थानिक प्रभागातील नवनिर्वाचित नगरसेवकांचा सन्मान सोहळा कोथरुडमधील सन्मित्र संघाच्या मैदानावर आयोजित करण्यात आला होता. यावेळी पुण्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, संघाचे अध्यक्ष माणिकराव हळबे, कार्याध्यक्ष दिवाकर निमकर, सचिव वसंत कुलकर्णी,आदी उपस्थित होते. माणिकराव हळबे यांनी यावेळी १ लाख रुपयांची देणगी सन्मित्र संघाला दिली. कार्यक्रमात सन्मित्र संघाने शताब्दीनिमित्त केलेल्या '१०० खेळाडूंच्या प्रशिक्षण संकल्पाचे पूर्णत्व यावेळी झाले. यावेळी ५ खेळाडूं व त्यांच्या प्रशिक्षकांचा प्रातिनिधीक स्वरूपात सन्मान करण्यात आला. पुणे मनपा मधील नवनिर्वाचित नगरसेवक राघवेंद्र उर्फ बापू मानकर, मंजुश्री खर्डेकर, वासंती जाधव, पुनित जोशी यांचा सन्मान करण्यात आला. जगन्नाथ लकडे म्हणाले, सन्मित्र संघाने १०३ वर्षात चांगली वाटचाल केली आहे. अनेक खेळाडू येथे घडले आहेत. सीएसआर आणि दत्तक खेळाडू संकल्पनेतून अनेक खेळाडू घडू शकतील. आज मैदाने आणि सोयी - सुविधा कमी आहेत. त्यातून सन्मित्र संघासारख्या संस्थांनी खेळ सुरु ठेवले आहेत. इतर देशांमध्ये खेळाला महत्व आहे. लहान वयात मुलांना खेळाकडे नेण्यास चळवळ उभी करणे गरजेचे आहे. रुग्णालयांची संख्या कमी करण्यासाठी मुले मैदानात येणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. पुनीत जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. दिवाकर निमकर यांनी प्रास्ताविक केले. राजेश दामले यांनी सूत्रसंचालन केले. सहकार्यवाह शिरीष मोरे यांनी आभार मानले.

## पुण्यातील १२ 'कागदावरील' रस्ते वर्षभरात प्रत्यक्षात येणार : आयुक्तांचा दावा

**पुणे : दैनिक संध्या**

शहरातील रखडलेल्या रस्त्यांच्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पाला पुन्हा गती देण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. पुढील वर्षभरात ३३ प्रस्तावित मिसिंग लिंकपैकी १२ महत्त्वाच्या लिंक पूर्ण करण्याचा दावा महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी केला. हे रस्ते प्रत्यक्षात अवतरल्यास उपनगरांमधील वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे. महापालिकेच्या विकास आराखड्यासह (डीपी) समाविष्ट गावांच्या प्रादेशिक विकास आराखड्याचा (आरपी) विचार करून ऑगस्ट २०२२ मध्ये शहरातील रस्त्यांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. या पाहणीत भूसंपादन, तांत्रिक अडचणी आणि अन्य कारणांमुळे अनेक रस्त्यांची कामे अपूर्ण राहिल्याचे समोर आले होते. हे अपूर्ण दुवे जोडल्यास नव्या रस्त्यांची आवश्यकता मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा निष्कर्ष काढत पथ विभागाने मिसिंग लिंक विकसित करण्याचा निर्णय घेतला. सल्लागार संस्थेच्या अहवालानुसार, शहरात सुमारे ७०० मिसिंग लिंक असून त्यांची एकूण लांबी ५२० किलोमीटर आहे. वाहतुकीवर सर्वाधिक परिणामकारक ठरणाऱ्या ३३ मिसिंग लिंक प्राधान्याने विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या ३३ लिंकची एकूण लांबी सुमारे १२ किलोमीटर असून, त्या पूर्ण झाल्यानंतर ६० किलोमीटर लांबीचे सलग रस्ते नागरिकांना उपलब्ध होतील. गेल्या दीड वर्षापासून या प्रकल्पाची गती मंदावल्याने प्रशासनावर टीका होत होती. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी प्रकल्पाचा आढावा घेऊन कामाला वेग देण्याचे निर्देश दिले आहेत. यासाठी आवश्यक ठिकाणी सक्तीच्या भूसंपादनाची प्रक्रियाही राबविण्यात येणार आहे. या मिसिंग लिंकमध्ये लोकमत प्रेस ते सावित्री गार्डन या रस्त्यावर महापालिकेने आत्तापर्यंत सुमारे अडीच कोटी रुपये खर्च केले आहेत. पण जागा ताब्यात नसताना अर्धवट रस्ते केले जात आहेत. जेथे काम केले आहे, त्याचा नागरिकांना काहीही उपयोग होत नाही. त्यामुळे हा खर्च वाया जात आहे. अशीच स्थिती शहरातील अन्य मिसिंग लिंकची आहे. वर्षभरात हे रस्ते पूर्ण झाले तर नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# भारतीय मजदूर संघाचा वर्धापन दिन उत्साहात

**भव्य कामगार मेळावा संपन्न**

■ पुणे (दै. संध्या)




भारतीय मजदूर संघ पुणे जिल्ह्याच्या वतीने भारतीय मजदूर संघाचा ७२ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात व संघटनात्मक वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त लेडी रमाबाई हॉल, एस. पी. कॉलेज, टिळक रोड, पुणे येथे भव्य कामगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. विविध उद्योगांतील उद्योगप्रमुख, पदाधिकारी, सभासद, कार्यकर्ते आणि कामगार बांधवांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे सभागृह खचाखच भरले होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून भारतमाता, भगवान विश्वकर्मा आणि पूजनीय दत्तोपंत ठेंगडी यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यानंतर पुणे जिल्ह्याचे सचिव श्री. सागर पवार यांनी मागील वर्षभरात भारतीय मजदूर संघ पुणे जिल्ह्याने विविध उद्योगांमध्ये केलेल्या संघटनात्मक कार्याचा, वेतनवाढ करारांचा, नवीन युनिट स्थापनेचा, सदस्य नोंदणी अभियानाचा, कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी राबविलेल्या आंदोलनांचा तसेच विविध उपक्रमांचा सविस्तर अहवाल सादर केला. या अहवालातून जिल्ह्यातील संघटनात्मक विस्तार, कामगारहितासाठी केलेले सातत्यपूर्ण प्रयत्न आणि आगामी कार्यदिशेचा प्रभावी आढावा उपस्थितांसमोर मांडण्यात आला. या मेळाव्यास भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा. सुधांशू रानडे, अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्या श्रीमती तृप्ती आळती, भारतीय मजदूर संघाचे माजी अखिल भारतीय महामंत्री श्री. रवींद्र हिंमते, पुणे जिल्हाध्यक्ष श्री. अर्जुन चव्हाण, जिल्हा सचिव श्री. सागर पवार, प्रदेश उपाध्यक्षा श्रीमती वंदना कामठे, प्रदेश सचिव श्री. ज्ञानेश्वर जाधव, तसेच विराज टिकेकर, हरी सोनी, विवेक ठकार, अजेंद्र जोशी, मनोज भदारके, गणेश टिंगरे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, उद्योगप्रमुख, सभासद व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मेळाव्यास औद्योगिक क्षेत्र, बँकिंग क्षेत्र, असंघटित क्षेत्र, बांधकाम क्षेत्र, पुणे मेट्रो, बीडी उद्योग, रेल्वे, रिक्षा चालक, बांधकाम कामगार,, ओला , उबेर प्लॅटफॉर्म वर्कर्स, तसेच पुणे शहर, पिंपरी-चिंचवड, उर्से, चाकण, कुरकुंभ, शिरवळ आदी औद्योगिक परिसरांतील कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मेळाव्याला मार्गदर्शन करताना मा. सुधांशू रानडे यांनी भारतीय मजदूर संघाचा ७२ वर्षांचा गौरवशाली इतिहास, संघटनेची राष्ट्रवादी वैचारिक भूमिका, भारतीय कामगार चळवळीतील योगदान आणि भविष्यातील आव्हाने यांचा सखोल आढावा घेतला. बदलत्या औद्योगिक परिस्थितीत संघटन विस्तार, सदस्य नोंदणी आणि कामगारांच्या न्याय्य हक्कांच्या संरक्षणासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी केंद्र सरकारने प्रस्तावित केलेल्या चार कामगार संहितांबाबत (Labour Codes) भारतीय मजदूर संघाने विविध स्तरांवर सविस्तर सूचना व सुधारणा केंद्र सरकारसमोर मांडल्या असल्याचे सांगितले. तसेच मुंबई येथे झालेल्या भव्य मोर्चाद्वारेही कामगारांच्या भावना शासनापर्यंत पोहोचविण्यात आल्या असून, सरकारने भारतीय मजदूर संघाने सुचविलेल्या सुधारणा सकारात्मकपणे स्वीकारून कामगारांना न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. "कामगारांच्या हिताचे संरक्षण करणारे आवश्यक बदल सरकारने न केल्यास भारतीय मजदूर संघाला देशभर रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने आंदोलन छेडावे लागेल," असा स्पष्ट इशारा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा. सुधांशू रानडे यांनी दिला. त्यांच्या या घोषणेचे उपस्थित हजारो कामगारांनी टाळ्यांच्या कडकडाटात आणि घोषणाबाजी करून जोरदार स्वागत केले. श्रीमती तृप्ती आळती यांनी आपल्या जपान दौऱ्यातील अनुभव कथन करताना भारतीय मजदूर संघाच्या नेतृत्वाला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राप्त झालेली विश्वासार्हता, जागतिक कामगार चळवळीतील अनुभव आणि भारतीय मजदूर संघाच्या कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान जिल्हाध्यक्ष अर्जुन चव्हाण यांनी प्रास्ताविकामध्ये कामगारांच्या समोर आव्हानाबाबतीत मार्गदर्शन करुन एकजूटने मुकाबला करण्यास सज्ज रहावे असे मनोगत व्यक्त करण्यात आले. व उद्योगांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला. संपूर्ण मेळाव्यात संघटन, समर्पण, शिस्त आणि कामगार ऐक्याचे प्रेरणादायी वातावरण अनुभवास आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. मनोज भदारके यांनी केले, तर श्री. जनार्दन शिवारकर यांनी उपस्थित मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

कार्यक्रमाच्या शेवटी भारतीय मजदूर संघाच्या "राष्ट्रहित – उद्योगहित – कामगारहित" या त्रिसूत्रीचा पुनरुच्चार करण्यात आला. देशहित, उद्योगहित आणि कामगारहित यांचा समतोल राखत संघटन अधिक बळकट करण्याचा तसेच कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार सर्व उपस्थितांनी व्यक्त केला.

## विद्यार्थ्यांविरोधात पोलीस बळाचा वापर नको

■ पुणे (दै. संध्या)

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा आणि परीक्षा पद्धतीत सुधारणा व्हाव्या अशा मागणीसाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन करत असलेल्या विद्यार्थी, विद्यार्थिनींविरोधात पोलीस बळाचा वापर करून त्यांना मानहानीकारक वागणूक दिली जावू नये, अशा मागणीचे निवेदन माजी आमदार, प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी यांनी (शुक्रवारी) पोलीस आयुक्तांना दिले. पुण्यात आज विद्यार्थ्यांचा मोर्चा निघाला होता. त्या मार्चात मोहन जोशी सहभागी झाले. मोर्चाच्या सुरुवातीलाच मोहन जोशी यांनी बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना गुलाब पुष्प आणि पोलीस आयुक्तांना देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या निवेदनाची प्रत दिली. यावेळी काँग्रेस प्रदेश सचिव प्रशांत सुरसे, इंटकचे शहराध्यक्ष चेतन अगरवाल, प्रदेश सरचिटणीस सुरेश कांबळे, तसेच राजेंद्र शिंदे, नागेश खडके, महेश पवार, विकास सुपनार, अनिल कदम आदी कार्यकर्ते उपस्थित होते. मुंबईतील दादर येथे एका आंदोलनकर्त्या युवतीचा विनयभंग करण्यात आला आणि मानहानी करणारी वागणूक तिला पोलीसांकडून मिळाली, या प्रसंगाचा व्हिडिओ व्हायरल झाला असून तो पहाताना संताप होत असून आंदोलनातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत त्यांच्या पालकांच्या मनात काळजी निर्माण झाली आहे.

## प्रधानांचा राजीनामा लोकशाहीचा विजय

■ पुणे (दै. संध्या)

गेली १२ वर्षे मनमानी व हुकुमशाही पद्धतीने देशाचा कारभार करणाऱ्या केंद्रातील भाजपच्या मोदी सरकारला अखेरीस विद्यार्थ्यांच्या प्रखर आंदोलनामुळे झुकावे लागले हा लोकशाहीचा मोठा विजय आहे. नीट पेपर फुटी मध्ये केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना अखेरीस राजीनामा द्याला लागला हि निश्चितच ऐतिहासिक घटना आहे. तरुण विद्यार्थ्यांच्या बरोबरच लोकसभेतील विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस पक्षाने देखील संसदेत आणि संसदे बाहेर मोठा आवाज उठवला याच्या एकत्रित परिणामामुळे अखेरीस मोदी सरकारला झुकावे लागले. याबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन तर केलेच पाहिजे शिवाय पालकांचे हि आभार मानले पाहिजे. गेली १२ वर्षे मोदी सरकारने देशात जे भीतीचे वातावरण निर्माण केले त्याचा चक्काचूर या विद्यार्थी आंदोलनाने झाला. 'प्रधान गेले आता पंतप्रधान हि जातील' हि भावना जनतेते व तरुणांमध्ये निर्माण झाली आहे, भय संपले आहे आणि लोकशाहीचा विजय झाला आहे हे या यशस्वी आंदोलनातून दिसून येते.

## रोटरी क्लब ऑफ खडकीचा 'व्हिजन फॉर ऑल' उपक्रम सुरू

### पीएमपीएमएलच्या ८ हजार चालक-वाहकांची मोफत नेत्रतपासणी; गरजूंना उच्च दर्जाचे चष्मेही मिळणार

■ पुणे (दै. संध्या)

रस्ते सुरक्षा आणि सार्वजनिक आरोग्याला चालना देण्यासाठी रोटरी क्लब ऑफ खडकी, रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट आणि एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्हिजन फॉर ऑल' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ स्वारगेट येथील पीएमपीएमएल बस डेपोमध्ये करण्यात आला. या उपक्रमांतर्गत पुण्यातील सुमारे ८ हजार पीएमपीएमएल चालक आणि वाहकांची मोफत सर्वसमावेशक नेत्रतपासणी करण्यात येणार असून, गरजेनुसार त्यांना उच्च दर्जाचे एसिलॉर कंपनीचे चष्मे तसेच प्राथमिक नेत्रोपचार सेवा विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.



उद्घाटन समारंभाला रोटरी क्लब ऑफ खडकीचे अध्यक्ष रोटेरियन शरद जैन, एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. परवेझ बिलिमोरिया, पीएमपीएमएलचे जनसंपर्क अधिकारी नागेश गायकवाड, रोटेरियन महेश माखिजा, मंजू प्रसाद, शशी भाटिया, अनंत पै तसेच क्लबचे सदस्य उपस्थित होते. यावेळी पीएमपीएमएलचे व्यवस्थापकीय संचालक महेश आवध, उपव्यवस्थापकीय संचालिका ॲलिस पोरे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विजयकुमार सरनाईक यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

प्रास्ताविकात रोटरी क्लब ऑफ खडकीचे अध्यक्ष रोटेरियन शरद जैन म्हणाले, "चालकांची उत्तम दृष्टी ही सुरक्षित वाहनचालना आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत आवश्यक आहे. या उपक्रमामुळे चालक आणि वाहकांना वेळेत नेत्रतपासणी व उपचार मिळतील. त्याचा थेट फायदा रस्ते सुरक्षेला होणार असून अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल."

रोटेरियन मंजू प्रसाद यांनी सांगितले की, रोटरी क्लब ऑफ खडकी आणि रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ विविध सामाजिक उपक्रमांमध्ये एकत्रितपणे कार्यरत आहेत. त्यातूनच या प्रकल्पाची संकल्पना साकार झाली. ट्रस्टचे राजीवभाई मेहता यांच्या सहकार्यामुळे लाभार्थ्यांना उच्च प्रतीचे एसिलॉर चष्मे पूर्णपणे मोफत दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रकल्प समितीचे अध्यक्ष रोटेरियन महेश माखिजा यांनी सांगितले की, या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात स्वारगेट डेपोतील सुमारे ८०० चालक आणि वाहकांची तीन दिवसांत नेत्रतपासणी केली जाणार आहे. त्यानंतर हा उपक्रम पुण्यातील पीएमपीएमएलच्या सर्व १८ डेपोंमध्ये राबविण्यात येईल.

एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. परवेझ बिलिमोरिया म्हणाले, "रोटरी क्लब ऑफ खडकीसोबतची ही भागीदारी ही केवळ आरोग्य सेवा नसून प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि सार्वजनिक सुरक्षेसाठीची महत्त्वपूर्ण सामाजिक गुंतवणूक आहे."

'व्हिजन फॉर ऑल' हा उपक्रम रोटरी क्लब ऑफ खडकी, रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट, एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटल आणि पीएमपीएमएल यांच्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक असून, सार्वजनिक वाहतूक कर्मचाऱ्यांचे आरोग्य सुधारण्याबरोबरच पुण्यातील रस्ते अधिक सुरक्षित करण्याच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# पंढरीची वारी : चालताना देह थकतो, पण मन विठ्ठलमय होते!

■ पुणे (दै. संध्या)

■ ॲड.उमाकांत आदमाने ■
कवी, लेखक, निवेदक, पुणे
मो.नं.९८२२५३६१४३

आषाढी एकादशी जवळ आली की महाराष्ट्राच्या मातीला एक वेगळाच गंध येतो. गावोगावच्या रस्त्यांवर टाळ-मृदुंगाचा नाद घुमू लागतो. भगव्या पताका वाऱ्यावर डोलू लागतात. मुखी विठ्ठलाचे नाम आणि हृदयात पंढरीच्या सावळ्या विठुरायाच्या दर्शनाची आस घेऊन लाखो वारकरी पंढरीच्या दिशेने निघतात. कुणाच्या पायात चप्पल नसते, कुणाच्या खांद्यावर संसाराचे ओझे असते; पण प्रत्येकाच्या हृदयात एकच श्रीमंती असते

'माझा विठ्ठल मला भेटणार!' : पंढरीची वारी म्हणजे केवळ पंढरपूरकडे जाणारा पायी प्रवास नाही; ती अंतर्मनाला परमेश्वराच्या चरणांशी जोडणारी एक आध्यात्मिक यात्रा आहे. हा प्रवास पावलांनी जितका चालला जातो, त्यापेक्षा तो भावनेने अधिक जगला जातो. या वारीत श्रीमंत-गरीब, लहान-मोठा, स्त्री-पुरुष, शेतकरी-कष्टकरी, शिक्षित-अशिक्षित असे कोणतेही भेद उरत नाहीत. सर्वांची एकच ओळख वारकरी ! आणि सर्वांच्या ओठांवर एकच नाम

विठ्ठल! विठ्ठल! : पहाटेची वेळ असते. आकाशाच्या कुशीत अजूनही अंधाराची सावली असते. दूरवरून टाळांचा मंजुळ नाद कानावर येतो. एखादा वारकरी हळूच म्हणतो, "ज्ञानोबा माऊली तुकाराम..." :



आणि क्षणात हजारो कंठ त्याला प्रतिसाद देतात.

"पंढरीनाथ महाराज की जय!"

टाळांचा ठेका धरला जातो. मृदुंगाचा ताल सुरू होतो. भगव्या पताका उंचावतात आणि दिंडी पुन्हा मार्गस्थ होते. अनवाणी पायांनी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर मात्र थकव्याची छाया नसते. पायाला फोड आलेले असतात, अंगावर उन्हाचा चटका असतो, कधी पावसाच्या सरी अंग भिजवतात; तरीही त्यांच्या ओठांवर नामस्मरण असते.

रस्त्याच्या दुतर्फा उभे असलेले गावकरी वारकऱ्यांचे स्वागत करतात. कुणी पाणी देतो, कुणी ताक देतो, कुणी चहा देतो, तर कुणी प्रेमाने दोन घास खाऊ घालतो. कुणी म्हणतो, "माऊली, थोडं विसावा घ्या!"

त्या एका शब्दातच जणू आईची माया उतरलेली असते.

काही अंतर चालल्यानंतर दिंडी एखाद्या सावलीच्या ठिकाणी विसावते. उन्हाने तापलेले पाय थांबतात. कुणी आपली पाण्याची बाटली पुढे करतो, कुणी दुसऱ्याच्या पायांना चोळून देतो. कुणी आपल्या जवळची भाकरी दुसऱ्या वारकऱ्याबरोबर वाटून खातो. त्या क्षणी जाणवते—वारी माणसाला देव भेटण्याआधी माणूस म्हणून जगायला शिकवते.

थोडा वेळ विश्रांती घेतल्यानंतर कुठेतरी प्रवचन सुरू होते. एखादा कीर्तनकार विठ्ठलाच्या भक्तीची महती सांगत असतो. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ यांच्या अभंगांमधून जीवनाचा अर्थ उलगडत असतो.

कीर्तनकाराचा आवाज वातावरणात घुमतो

"देव शोधायला दूर जाण्याची गरज नाही;
जिथे प्रेम आहे, जिथे माणुसकी आहे,
जिथे दुसऱ्याच्या दुःखात आपले मन रमते,
तिथेच विठ्ठल उभा असतो!"

हे शब्द कानावर पडतात आणि थकलेले मन पुन्हा नव्या उत्साहाने भरून जाते. प्रवचन संपते आणि मग सुरू होते भजनाची मैफल. टाळकरी ताल धरतात. मृदुंगाचा ठेका वाढतो. एक अभंग सुरू होतो आणि पाहता पाहता सारे वारकरी त्यात रममाण होतात.

"विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल..."

कुणाचे डोळे मिटलेले असतात, कुणाचे हात आकाशाकडे उंचावलेले असतात, कुणाच्या डोळ्यांत आनंदाश्रू असतात. कुणी तालावर डोलत असतो, कुणी नामस्मरणात तल्लीन झालेला असतो. त्या क्षणी देहाचा थकवा, संसाराच्या चिंता, दुःख, वेदना—सगळे काही विसरले जाते.

उरतो तो फक्त विठ्ठल!

त्या भजनात मीही नकळत हरवून जातो. वारकऱ्यांच्या चेहऱ्याकडे पाहताना जाणवते की, हे लोक पंढरपूरला चालले आहेत की पंढरपूर त्यांच्याकडे चालत आले आहे? त्यांच्या प्रत्येक पावलात भक्ती आहे, प्रत्येक श्वासात नाम आहे आणि प्रत्येक हृदयात माऊलीचा वास आहे.

वारी पुढे सरकत राहते.

कधी ऊन, कधी वारा, कधी मुसळधार पाऊस... रस्ते बदलतात, गावं मागे पडतात, पण वारकऱ्यांची पावलं थांबत नाहीत. एखादा वृद्ध वारकरी काठीच्या आधाराने चालत असतो. त्याच्या पायांना वेदना असतात; पण चेहऱ्यावर समाधान असते. एखादी माय आपल्या लेकराला घेऊन चाललेली असते. एखादा तरुण उत्साहाने टाळ वाजवत असतो. कुणी आयुष्यभराची दुःखं घेऊन आलेला असतो, तर कुणी मनातल्या नवसाची पूर्ती करण्यासाठी चालत असतो.

पण सगळ्यांच्या मनात एकच ध्यास

"कधी येईल पंढरी?
कधी दिसेल चंद्रभागा?
कधी भेटेल माझा विठ्ठल?"
अखेर तो क्षण जवळ येतो.

दूरवर पंढरीची चाहूल लागते. चंद्रभागेचा परिसर दिसू लागतो. वारकऱ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटतात. टाळ-मृदुंगाचा नाद अधिकच वाढतो. मुखातून एकच जयघोष उमटतो

"ज्ञानोबा माऊली तुकाराम!"
"पुंडलिक वरदा हरी विठ्ठल!"

चंद्रभागेच्या पवित्र पाण्यात स्नान करताना जणू प्रवासभराचा थकवा वाहून जातो. मन हलके होते. आणि मग विठ्ठलाच्या मंदिराच्या दिशेने पावले वळतात.

इतके दिवस ज्या विठ्ठलासाठी चालत होतो, ज्याचे नाम घेत होतो, ज्याच्या दर्शनाची आस मनात होती, तो सावळा विठ्ठल आता डोळ्यांसमोर उभा असतो.

कटेवर हात ठेवून...
विटेवर उभा राहून...
भक्तांची वाट पाहत!

त्या क्षणी डोळ्यांतून अश्रू वाहू लागतात. मनात एकच भावना दाटून येते

"देवा, एवढा मोठा प्रवास आम्ही केला;
पण खरं सांगायचं तर आम्ही तुला भेटायला आलो नव्हतो...
तूच आम्हाला तुझ्यापर्यंत घेऊन आलास!"


पंढरीची वारी संपते; पण तिचा अनुभव संपत नाही. विठ्ठलाचे दर्शन घेऊन वारकरी पुन्हा आपल्या गावाकडे परततो. मात्र आता त्याच्या मनात एक नवा विठ्ठल जन्माला आलेला असतो माणुसकीचा, प्रेमाचा, समतेचा आणि भक्तीचा : वारी आपल्याला शिकवते की, आयुष्याच्या वाटेवर कितीही संकटे आली, कितीही अंतर चालावे लागले, कितीही पाय दुखले तरी ध्येयावरचा विश्वास सोडायचा नाही. वाटेत थकवा आला तर थांबायचे, विसावा घ्यायचा; पण प्रवास सोडायचा नाही. कारण शेवटी प्रत्येकाला आपापल्या पंढरीपर्यंत पोहोचायचे असते. म्हणूनच पंढरीची वारी ही केवळ धार्मिक परंपरा नाही; ती महाराष्ट्राच्या आत्म्याची यात्रा आहे. ती समतेची शाळा आहे, माणुसकीचे विद्यापीठ आहे आणि भक्तीच्या सागरात स्वतःला विसर्जित करण्याचा सुंदर सोहळा आहे. आजही जेव्हा टाळ-मृदुंगाचा नाद कानावर पडतो, तेव्हा मन नकळत पंढरीच्या वाटेवर निघून जाते. डोळ्यांसमोर भगव्या पताका डोलू लागतात. हजारो वारकऱ्यांच्या मुखातून एकच नाम ऐकू येते

"विठ्ठल... विठ्ठल... विठ्ठल..."
आणि मग मन म्हणते

चालता चालता पाय थकले, तरी मन
थकले नाही; वारी संपली तरी विठ्ठलभक्ती
संपली नाही. कारण पंढरीपर्यंतचा
प्रवास हा फक्त रस्त्यांचा नसतो, तो
माणसापासून माणुसकीकडे आणि
भक्तापासून विठ्ठलाकडे जाणारा असतो!

■ ■ ■

## कलेचा हात जोपासतोय विश्वनाथ



**(दै. संध्या) : त्याचं नाव विश्वनाथ. पण तो गावात ओळखला जातोय पिंट्या म्हणून. घरात साऱ्यांचाच तो पिंट्या बनला, तसा अख्ख्या गावाचाही.**

साहजिकच त्याच्या खऱ्या नावाची कोणाला गरजच भासली नाही. आज चाळीशीत असलेला पिंट्या अवघ्या 15 व्या वर्षपासूनच मोलमजुरी करतोय.

पारकर टी हाऊस हे मालवण तालुक्यातील चिंदर गावातील परवाना मिळालेले पहिले हॉटेल. याच दुकानात पिंट्या संदीप पारकर याच्या हाताखाली काम करू लागला. आज संदीप आपल्यात नाही, पण पिंट्या आजही पारकर कुटुंबाची मनोभावे चाकरी करतोय आणि तोही अगदी इमानेइतबारे. अचूक आणि नियोजनबद्ध काम करणे हा पिंट्याचा गुणधर्म.

सदैव हसतमुख, आनंदी आणि तितकाच खोडकर पिंट्या हे आमच्या भटवाडीला लाभलेले दैवी देणे आहे. कोणतेही काम निष्ठेने आणि विश्वासाने करणारा पिंट्या समाजप्रियसुद्धा आहे. तो उत्तम मृदंगवादकही आहे.

पिंट्याचे आजोबा विठ्ठल दळवी हे हाडाचे कलाकार. लोक त्यांना आदराने दादा म्हणत. गावातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ असामी. सुतारकाम, लोहारकाम यात त्यांचा जसा हातखंडा तसा गणपती बनवण्यातही. आमच्या गावातील अनेक गणपती दादांच्या शाळेत बनायचे. दादांचे 2006 साली देहावसान झाले. आता गणपती शाळा बंद पडणार असे त्यावेळी अनेकांना वाटू लागले. पण आजोबांच्या शाळेत चालणारी कामे पाहिलेला पिंट्या स्वस्थ बसला नाही. आपल्या वडिलांच्या मदतीने पिंट्याने आपल्या हाती ब्रश घेतले. पहिल्या एक -दोन वर्षात काही मोजकेच गणपती बनवले. मग हळूहळू पिंट्याने आपली गणपतीची संख्या वाढवली. आज पिंट्याच्या शाळेत तब्बल शेकडो गणपती आहेत. या मूर्ती 1 फुटापासून 7 फुटापर्यंत आहेत.

आपली दुकानातील नोकरी सांभाळून पिंट्या दिवस-रात्र गणपतीच्या शाळेत राबत असतो. त्याची आत्या ललिता (लग्नानंतर ती सौ.सुचिता संदीप परब झाली.) हिची मोलाची साथ पिंट्याला लाभतेय.

पिंट्या आता रायगड जिल्ह्यातील पेणच्या शाळेतून सुबक मूर्त्या घेऊन येतो आणि त्यावर आपला जीव ओततो. ऐन पावसाळ्यात शेतीची कामे सांभाळून पिंट्या आता रात्रंदिवस शाळेत वावरताना दिसेल.

त्याच्या या आकर्षक मूर्ती आता गावोगावी जाऊ लागल्या आहेत. अतिशय आकर्षक, रेखीव आणि देखण्या मूर्त्या हे पिंट्याचे कौशल्य आहे. डोळे उघडणे हे सर्वात कठीण काम. पिंट्याचा यात हातखंडा आहे.. मोठा भाऊ नवनाथ, वडील, बंडूकाका, नारायण येरम, शशी नाटेकर तसेच वाडीतील अनेक जण आणि मुंबईहून आलेली भावंडे आता पिंट्याच्या शाळेत रात्रंदिवस राबताना दिसतील.

त्याच्या प्रशस्त घरातल्या खोल्या आता गणपतीने भरलेल्या आहेत.

1975 साली आमचा गणपती पिंट्याच्या आजोबांकडे होता. मी त्यावेळी अवघा 10 वर्षांचा होतो. वडिलांनी 15 रुपये गणपतीच्या पुढ्यातील विड्यावर ठेवले. आज या घटनेला 50 वर्षे झाली. आमचा गणपती आजही याच शाळेत आहे.

अत्यंत प्रामाणिक, सदा हसतमुख आणि परोपकारी पिंट्या आज अवघ्या चाळीशीचा आहे. पुढील 50 वर्षे तो निश्चितच आपल्या आजोबांचा वारसा चालवेल. तेव्हा दळवी घराण्यातील गणपती शाळेचा शतक महोत्सव साजरा होईल. गणपतीबाप्पा,

या कामी आमच्या पिंट्याला निश्चितच सुयश दे. त्याच्या हातून विघ्नहर्त्या गजाननाची आणि पर्यायाने गावाची सेवा घडू दे, हेचि एक मागणे.

**- आत्माराम नाटेकर, ज्येष्ठ पत्रकार**

## 'अजितदादा पवार कृषी समृद्धी कर्ज योजने'तून

# ₹१ हजार कोटींच्या कर्जवाटपाचे उद्दिष्ट

### पुणे जिल्ह्यातील ६१,९०० शेतकऱ्यांना ₹५२३ कोटी २२ लाखांच्या कर्जमाफीचा लाभ; आदर्श शेतकऱ्यांचा सन्मान

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

पुणे : पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने आयोजित 'अजितदादा पवार कृषी समृद्धी कर्ज योजना' शुभारंभ, भव्य शेतकरी मेळावा आणि आदर्श शेतकरी सन्मान सोहळा उत्साहात संपन्न झाला. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्यासाठी ₹१ हजार कोटींच्या कर्जवाटपाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.



कार्यक्रमात उपस्थित शेतकरी बांधव-भगिनींशी संवाद साधताना दिवंगत अजित पवार यांनी शेती, शेतकरी, सहकार आणि ग्रामीण विकास क्षेत्रासाठी दिलेल्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. 'अजितदादा पवार कृषी समृद्धी कर्ज योजना' ही त्यांच्या शेतकरीहिताच्या विचारांना कृतीतून दिलेली आदरांजली असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

बदलत्या काळानुसार शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्याची आवश्यकता असून, विशेषतः ऊस शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून उत्पादनवाढीसह शाश्वत शेतीला चालना देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

आधुनिक तंत्रज्ञान आणि मजबूत सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.

राज्य शासनाने महिला शेतकऱ्यांना अधिकृत शेतकरी म्हणून दिलेल्या मान्यतेचे यावेळी स्वागत करण्यात आले. तसेच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'अंतर्गत पुणे जिल्ह्यातील ६१ हजार ९०० पात्र शेतकऱ्यांना एकूण ₹५२३ कोटी २२ लाखांच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार असल्याची माहिती देण्यात आली. या शेतकरी मेळाव्यात पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये शेतीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आदर्श शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. 'शेतकरी सक्षम झाला तर महाराष्ट्र सक्षम होईल,' हा अजित पवार यांचा विचार पुढे नेत आधुनिक तंत्रज्ञान, सक्षम सहकार व्यवस्था आणि शाश्वत शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी महायुती सरकार कटिबद्ध असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

> अजित पवार यांनी जपलेला विकासाचा आणि शेतकरी कल्याणाचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी शेतकऱ्यांना 'जनसेवा सप्ताह' आणि 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## पुण्यात AI, गेमिंग आणि सर्जनशीलतेच्या एका नव्या दिवसाची सुरुवात

**पुणे (दै. संध्या) :**

NVIDIA ने आज मेस्से ग्लोबल कन्व्हेन्शन सेंटर येथे GeForce Day 2026 चा यशस्वी समारोप केला. या कार्यक्रमात 6000+ विद्यार्थी, क्रिएटर्स, डेव्हलपर्स आणि गेमर्स एकत्र आले होते. NVIDIA च्या नवनवीन तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष वापर करून पुढील पिढीचे AI कॉम्प्युटिंग सर्जनशीलता आणि कंटेंट क्रिएशनमध्ये कसे बदल घडवून आणत आहे, हे येथे प्रदर्शित करण्यात आले.

पुण्यातील प्रमुख अभियांत्रिकी संस्थांच्या विद्यार्थ्यांसह सर्व उपस्थितांनी नवीनतम GeForce RTX 50 मालिकेचे लॅपटॉप आणि डेस्कटॉप अनुभवले, RTX AI अनुभवाच्या झोनमध्ये AI-संचलित कार्यपद्धतींचा शोध घेतला, आणि स्थानिक AI विकासासाठी NVIDIA चे वैयक्तिक AI सुपरकॉम्प्युटर 'DGX




Spark' चे थेट प्रात्यक्षिक पाहिले.

"GeForce Day ही आम्ही गेल्या काही वर्षांत एका स्पष्ट उद्देशाने तयार केलेली मालिका आहे. विद्यार्थ्यांना हे अनुभवण्याची संधी देणे की उत्तम हार्डवेअरमुळे काय शक्य होऊ शकते. उच्च दर्जाचे गेमिंग असो, AI सोबत कोडिंग असो, एजेंटिक AI चा वापर असो किंवा कंटेंट क्रिएशन असो—हेच AI-संचलित RTX प्लॅटफॉर्म नवीन पिढीच्या नवोपक्रमाला सक्षम करत आहे. पुण्याच्या आवृत्तीत हे उत्तम प्रकारे दिसून आले, जिथे विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांचा शोध घेतानाच त्यांना जोडणाऱ्या तंत्रज्ञानाचा अनुभव घेतला.

## वारकऱ्यांसाठी यंदा प्रथमच एअर अँम्ब्युलन्स सेवा, बाइक अँम्ब्युलन्स

**मुंबई (दै. संध्या) :**

- 'आनंद वारी'ला लाखो वारकऱ्यांचा प्रचंड प्रतिसाद
- शिवसेना राष्ट्रीय सचिव व प्रवक्त्या शायना एन. सी यांची माहिती

शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशांनुसार शिवसेनेकडून सुरु असलेल्या 'आनंद वारी'ला लाखो वारकऱ्यांकडून प्रतिसाद मिळत आहे. आषाढ वारी सोहळ्यात पालखी मार्गावर शिवसेनेच्या वतीने सुरु केलेल्या आरोग्य सुविधांचा आणि निर्मल वारीचा लाखो वारकऱ्यांनी लाभ घेतल्याची माहिती शिवसेनेच्या राष्ट्रीय सचिव व प्रवक्त्या शायना एन.सी यांनी आज दिली. बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी शायना एन.सी यांनी आषाढी वारीतील त्यांचे अनुभव सांगितले.



त्या म्हणाल्या की मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी वारकऱ्यांसाठी आणि आषाढ वारीसाठी अनेक मोठे निर्णय घेतले. तेव्हा सुरु केलेल्या निर्मल वारीला वारकऱ्यांकडून आजही चांगला प्रतिसाद मिळत आहे. वारीतील नोंदणीकृत दिंडीला २० हजार रुपयांचे अनुदान सुरु करण्यात आले. याबद्दल वारीतील अनेक दिंडीप्रमुखांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे आभार मानले. तसेच वारकऱ्यांसाठी ५ लाख रुपयांचा विमा, वारकरी महामंडळासाठी ५० कोटींचा निधी देण्यात आला. या महामंडळाच्या माध्यमातून ज्येष्ठ वारकऱ्यांना पेन्शन, इंद्रायणी, चंद्रभागा आणि गोदावरी या नद्या प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी उपक्रम हाती घेण्यात येणार आहे. पालखी मार्गाच्या विस्तारासाठी आणि विकासासाठी तत्कालीन मुख्यमंत्री शिंदे यांनी मोठे निर्णय घेतले. त्याचा फायदा आज वारीतून दिसत आहे, असे शायना एन.सी म्हणाल्या.

निर्मल वारी अभियानासाठी ३६.७१ कोटींची तरतूद करण्यात आली. वारकऱ्यांना स्वच्छ पाणी, स्वच्छता गृहे, निवारा आणि सुरक्षेसाठी प्रशासनाला निर्देश देण्यात आले आहेत. भजनी मंडळांना अनुदान दिल्याचे शायना एन.सी यांनी सांगितले.

> यंदा वारीत प्रथमच एअर अँम्ब्युलन्स उपलब्ध करुन देण्यात आली आहे. शिवसेना संसदीय पक्षाचे नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हे स्वत: वारीवर लक्ष ठेवून असून त्यांच्या सूचनांनुसार शिवसेना डॉक्टर्स सेलचे १३०० ते १५०० डॉक्टर्स आषाढ वारीत कार्यरत आहेत. त्याचबरोबर ३०० नियमित अँम्ब्युलन्स, २४ कार्डियाक अँम्ब्युलन्स, २२ आयसीयू अँम्ब्युलन्स वारकऱ्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी उपलब्ध करण्यात आल्याची माहिती शायना एन.सी यांनी दिली. महिला वारकऱ्यांसाठी हिरकणी कक्ष असून तेथे स्त्रीरोग तज्ज्ञांची विशेष पथके आहेत. गर्दीच्या ठिकाणी बाईक अँम्ब्युलन्स देखील उपलब्ध केल्याची माहिती शायना एन.सी यांनी दिली. त्यांनी पायी वारी करुन वारकऱ्यांशी संवाद साधला आणि शिवसेनेने सुरु केलेल्या आनंद वारी उपक्रमाविषयी वारकऱ्यांची मते जाणून घेतली. विविध योजनांच्या माध्यमातून वारकऱ्यांच्या विकासासाठी शिवसेना कटिबद्ध असल्याची ग्वाही शायना एन.सी यांनी दिली.

### पुण्यात आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये डोके व मानेच्या कर्करोगाच्या ४०० हून अधिक रुग्णांचे निदान आणि उपचार

## तोंडाच्या कर्करोगाचे प्रमाण सर्वाधिक

**पुणे (दै. संध्या) :**

एम ओ सी कॅन्सर केयर ने पुण्यात डोके व मानेच्या कर्करोगाचे वाढते प्रमाण चिंताजनक असल्याचे नमूद केले आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये पुण्यातील एम ओ सी कॅन्सर केयर च्या पाच उपचार केंद्रांमध्ये डोके व मानेच्या कर्करोगाच्या ४०० हून अधिक रुग्णांचे निदान करून उपचार करण्यात आले. एम ओ सी कॅन्सर केयरच्या पुण्यातील केंद्रांमध्ये निदान झालेल्या ४,००० हून अधिक नवीन कर्करोग रुग्णांपैकी हे प्रमाण ९ टक्क्यांहून अधिक आहे. यातील बहुतांश रुग्ण तोंडाच्या कर्करोगाने ग्रस्त होते. यावरून तंबाखूचे सेवन, उशिरा होणारे निदान, तोंडाच्या स्वच्छतेचा अभाव आणि जीवनशैलीशी संबंधित जोखीम घटकांचा सातत्याने होणारा परिणाम अधोरेखित होतो. डोके व मानेचा कर्करोग हा भारतातील सर्वाधिक आढळणाऱ्या कर्करोगांपैकी एक आहे. यामध्ये तोंडाच्या कर्करोगाचा मोठा वाटा आहे. धूम्रपान आणि धूम्रपानविरहित अशा दोन्ही प्रकारच्या तंबाखूच्या सेवनामुळे या कर्करोगाचा धोका सर्वाधिक असतो. मात्र, पारंपरिक जोखीम घटक नसलेल्या व्यक्तींमध्ये आणि तरुण प्रौढांमध्येही या आजाराचे प्रमाण वाढताना तज्ज्ञांना दिसून येत आहे. त्यामुळे अधिक जनजागृती, नियमित तोंडाची तपासणी आणि वेळेवर वैद्यकीय उपचार घेण्याची गरज अधोरेखित होते. त्याचबरोबर तरुणांमध्ये तंबाखूच्या वापराला आळा घालण्यासाठी कठोर धोरणात्मक उपाययोजनांचीही गरज आहे. डॉ. संजय देशमुख, संचालक, सर्जिकल ऑन्कोलॉजी, रुबी हॉल क्लिनिक, पुणे, म्हणाले, "डोके व मानेचा कर्करोग, विशेषतः तोंडाचा कर्करोग, हा आमच्या वैद्यकीय प्रॅक्टिसमध्ये निदान होणाऱ्या सर्वात सामान्य कर्करोगांपैकी एक आहे आणि दुर्दैवाने, आजही अनेक रुग्ण आजाराच्या प्रगत अवस्थेत उपचारासाठी येतात. यातील बहुतांश कर्करोग टाळता येण्याजोग्या जोखीम घटकांशी संबंधित आहेत, जसे की तंबाखूचे सेवन, अतिप्रमाणात मद्यपान आणि तोंडाच्या स्वच्छतेचा अभाव. मात्र, पारंपरिक जोखीम घटक नसलेल्या व्यक्तींमध्ये आणि तरुण रुग्णांमध्येही या आजाराचे प्रमाण वाढताना आम्ही पाहत आहोत. त्यामुळे जनजागृती आणि लवकर निदानाला पूर्वीपेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. तोंडातील कोणतीही जखम दोन आठवड्यांत बरी होत नसेल, सतत पांढरे किंवा लाल चट्टे दिसत असतील, गिळताना त्रास होत असेल, आवाजात बदल होत असेल किंवा मानेवर गाठ जाणवत असेल, तर त्याकडे कधीही दुर्लक्ष करू नये. कर्करोगाचे लवकर निदान झाल्यास डोके व मानेच्या कर्करोगावर प्रभावी उपचार करणे शक्य असते. अशा वेळी अनेकदा कमी तीव्रतेच्या उपचारांची आवश्यकता असते आणि रुग्णांच्या कार्यक्षमतेवर तसेच जीवनमानावरही चांगले परिणाम होतात.

## एडेमा ओळखा, वेळेत उपचार घ्या; सिपलाच्या मोहिमेत १२ लाखांहून अधिक तपासण्या

**सातारा (दै. संध्या) :**

सिपलाच्या 'सी एडेमा, सीक हेल्प' (See Edema, Seek Help) या जनजागृती उपक्रमांतर्गत ५ जुलै ते २४ जुलै २०२६ या कालावधीत पंढरपूर वारी मार्गावर मोफत सूज तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. आरोग्यतज्ज्ञांच्या समूहाने या शिबिरांद्वारे १२ लाखांहून अधिक नागरिकांची तपासणी केली आणि सूज येणे या आजाराविषयी जनजागृती केली. सूज ( Edema) येणे म्हणजे शरीरातील ऊतकांत अतिरिक्त द्रव साचल्यामुळे येणारी सूज होय. विशेषतः ही सूज शरीराच्या अनेक भागांमध्ये दिसून येत असल्यास किंवा त्यामागे स्पष्ट कारण नसल्यास, वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. एडेमा हा हृदयविकार, मूत्रपिंडांचे विकार, यकृताचे आजार तसेच थायरॉईडमधील असंतुलन यांसारख्या गंभीर आरोग्य समस्यांशी संबंधित असू शकतो.



त्यामुळे या उपक्रमाचा उद्देश सूज येण्याची लक्षणे लवकर ओळखण्यास प्रोत्साहन देणे, वेळेवर वैद्यकीय सल्ला घेण्याबाबत जागरूकता निर्माण करणे आणि समाजात या आजाराविषयी व्यापक जनजागृती करणे हा आहे. लवकर निदान आणि योग्य उपचारांद्वारे आजाराची प्रगती रोखण्यास तसेच रुग्णांचे आरोग्य अधिक चांगले राखण्यास या उपक्रमाची मदत होईल, असा या मोहिमेचा विश्वास आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### पत्रकार नासिकेत पानसरे यांचा पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते सन्मान

मुंबई (दैनिक संध्या) : कोकण मराठी साहित्य परिषदेच्या भांडुप शाखेच्या अध्यक्षपदी डॉ. प्रा.जिवबा रामचंद्र केळुसकर यांची बहुमताने निवड करण्यात आली.भांडुप येथे कोमसाप आणि स्वर्णिका पुस्तक प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी ही घोषणा करण्यात आली.या प्रसंगी त्यांचा कोमसापचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.व त्यांनी डॉ.केळुसकर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.तसेच ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे यांना पत्रकारितेतील योगदानाबद्दल पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमात देश हा देव असे माझा, कोकणचे सौंदर्य, ऑपरेशन सिंदूर या डॉ.जिवबा केळुसकर संपादित तीन काव्य संग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी मुंबईच्या महापौर रितू तावडे, अभिनेता पद्मश्री अशोक सराफ, माजी नगरपाल डॉ.जगन्नाथराव हेगडे, डॉ.प्रा.प्रदीप ढवळ, कोमसाप केंद्रीय अध्यक्ष सौ.नमिता कीर, ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे, आदींची भाषणे झाली.

### कर्जत-लोणावळा घाटातील तिसऱ्या रेल्वे मार्गाचे काम वेगात

मुंबई (दैनिक संध्या) : मध्य रेल्वेच्या कर्जत-लोणावळा या दक्षिण-पूर्व घाट विभागातील तिसऱ्या रेल्वे मार्गाच्या पुनर्बांधणीचे काम युद्धपातळीवर सुरू असून, यासाठी टप्प्याटप्प्याने ब्लॉक घेतले जात आहेत. घाटातील कठीण आणि आव्हानात्मक भौगोलिक परिस्थितीत हे काम सुरू असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने २५ ते २८ जुलै या कालावधीत अनेक महत्त्वाच्या एक्स्प्रेस गाड्या रद्द करण्यात आल्या असून, काही गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत. मुसळधार पावसामुळे काही दिवसांपूर्वी झालेल्या या घाट विभागात अनेक ठिकाणी दरडी कोसळल्या होत्या. त्यानंतर मध्य मार्गिका (मिडल लाईन) आणि डाऊन मार्गिका वाहतुकीसाठी पूर्ववत करण्यात रेल्वेला यश आले. आता तिसऱ्या मार्गावरील मातीचा ढिगारा हटविणे, भराव मजबूत करणे आणि रुळांची दुरुस्ती करण्याचे काम अहोरात्र सुरू आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत हे ब्लॉक घेण्यात आले असून, प्रवाशांनी प्रवासापूर्वी गाड्यांचे अद्ययावत वेळापत्रक तपासूनच नियोजन करावे, असे आवाहन मध्य रेल्वेने केले आहे. रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, २५ ते २८ जुलैदरम्यान २२१५७ सीएसएमटी-चेन्नई एक्स्प्रेस, २२७३२ सीएसएमटी-हैदराबाद एक्स्प्रेस, २२९४४ इंदूर-दौंड एक्स्प्रेस (२५ ते २७ जुलै),

## इंडियनऑइलची १० किलो आणि ५ किलो एलपीजी सिलिंडरसाठी एक्सप्रेस डिलिव्हरी सेवा सुरू

**पुणे (दै. संध्या) :**

इंडियनऑइलचे अध्यक्ष ए. एस. साहनी यांनी आज इंडेन एक्स्ट्रालाइट नाऊ (Indane XTRALITE NOW) या अभिनव 10 किलो कंपोझिट एलपीजी सिलिंडर सेवेसह एक्सप्रेस डिलिव्हरी सुविधेचा शुभारंभ केला. यावेळी सौमित्र पी. श्रीवास्तव, संचालक (मार्केटिंग) तसेच कंपनीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.




आधुनिक ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेले इंडेन एक्स्ट्रालाइट नाऊ हे हलके, गंजमुक्त कंपोझिट एलपीजी सिलिंडर अत्याधुनिक डिजिटल सेवा व्यवस्थेसह अधिक सोयीस्कर, सुरक्षित आणि पारदर्शक अनुभव देण्यासाठी विकसित करण्यात आले आहे. या सिलिंडरची पारदर्शक रचना ग्राहकांना उर्वरित एलपीजीचे प्रमाण सहज पाहता येईल अशी आहे. यासोबतच बुकिंगनंतर चार तासांच्या आत एक्सप्रेस डिलिव्हरी, ग्राहकांच्या पसंतीच्या वेळेनुसार डिलिव्हरी आणि अत्यल्प कागदपत्रांची आवश्यकता अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या कार्यक्रमादरम्यान इंडियनऑइलचे अध्यक्ष यांनी लोकप्रिय 5 किलो छोटू (Chhotu) एलपीजी सिलिंडरसाठीही एक्सप्रेस होम डिलिव्हरी सेवेचा शुभारंभ केला. आता हा सिलिंडरही बुकिंगनंतर चार तासांच्या आत ग्राहकांच्या घरी पोहोचवला जाणार आहे. या उपक्रमामुळे शहरी कुटुंबे, व्यावसायिक आणि लहान कुटुंबांच्या गरजेनुसार अधिक लवचिक आणि सोयीस्कर एलपीजी सेवा उपलब्ध करून देण्याच्या इंडियनऑइलच्या वचनबद्धतेला आणखी बळ मिळणार आहे.

यावेळी बोलताना इंडियनऑइलचे अध्यक्ष ए.एस. साहनी म्हणाले, "नवोन्मेष तेव्हाच अर्थपूर्ण ठरतो, जेव्हा तो ग्राहकांचे जीवन अधिक समृद्ध करतो. इंडेन एक्स्ट्रालाइट नाऊमध्ये अत्याधुनिक कंपोझिट सिलिंडर तंत्रज्ञान आणि अधिक सुलभ व सुधारित सेवा मॉडेलचा संगम साधून अधिक स्मार्ट, सुरक्षित आणि सोयीस्कर एलपीजी अनुभव देण्यात आला आहे. या सेवेच्या माध्यमातून इंडियनऑइल भविष्योन्मुख ऊर्जा उपाययोजना उपलब्ध करून देण्याच्या आपल्या वचनबद्धतेची पुनर्प्रतिष्ठा करत असून ग्राहक सेवेत नवे मानदंड निर्माण करत आहे."

इंडियनऑइलचे संचालक (मार्केटिंग) सौमित्र पी. श्रीवास्तव म्हणाले, "आजचे ग्राहक वेगवान सेवा, अधिक सुविधा आणि अखंड अनुभवाची अपेक्षा करतात. इंडेन एक्स्ट्रालाइट नाऊ ही सेवा नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानासोबत जलद आणि विश्वासार्ह वितरणाची जोड देत इंडियनऑइलच्या ग्राहककेंद्रित दृष्टिकोनाचे प्रतीक आहे. ही सेवा घरगुती एलपीजी अनुभवाला नवे स्वरूप देण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल आहे."

सुरुवातीला ही सेवा पुणे, गुरुग्राम, इंदूर आणि कोयंबतूर येथे उपलब्ध होणार असून, ऑगस्ट 2026 च्या मध्यापर्यंत आणखी 25 शहरांमध्ये आणि ऑक्टोबर 2026 अखेरीस देशातील प्रमुख शहरांमध्ये तिचा विस्तार करण्यात येणार आहे.

ग्राहक इंडियनऑइल वन ॲप आणि इंडियनऑइल ग्राहक वेबसाइट (https://cx.indianoil.in) द्वारे नवीन एलपीजी कनेक्शनसाठी नोंदणी तसेच रिफिल बुकिंग करू शकतील. तसेच, लवकरच व्हाट्सअप (7588888824) द्वारे बुकिंगची सुविधाही सुरू करण्यात येणार आहे. इंडियनऑइलच्या विस्तृत इंडेन वितरक नेटवर्क तसेच निवडक इंडियनऑइल रिटेल आउटलेट्समार्फत ही सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असून त्यामुळे ग्राहकांना अधिक व्यापक आणि सुलभ सेवा मिळणार आहे.

> इंडेन एक्स्ट्रालाइट नाऊ आणि छोटू सिलिंडरच्या एक्सप्रेस डिलिव्हरी सेवेद्वारे इंडियनऑइलचा उद्देश शहरी कुटुंबे, व्यावसायिक, निवासी संकुले आणि अधिक सोयीस्कर व दर्जेदार सेवांचा शोध घेणाऱ्या ग्राहकांसाठी वेगळा आणि ग्राहकाभिमुख एलपीजी पर्याय उपलब्ध करून देत एलपीजी बाजारातील आपले नेतृत्व अधिक मजबूत करणे हा आहे. भारतातील सर्वात मोठी एकात्मिक ऊर्जा कंपनी म्हणून इंडियनऑइल नवोन्मेष, डिजिटल तंत्रज्ञान आणि ग्राहककेंद्रित उपक्रमांच्या माध्यमातून जागतिक दर्जाच्या ऊर्जा सेवा पुरविण्यास कटिबद्ध आहे. इंडेन एक्स्ट्रालाइट नाऊचा शुभारंभ हा अधिक स्मार्ट, सुरक्षित आणि सोयीस्कर ऊर्जा उपाययोजना विकसित करण्याच्या कंपनीच्या प्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा असून, नागरिकांचे जीवन अधिक समृद्ध करण्याच्या आणि देशाच्या प्रगतीला ऊर्जा देण्याच्या इंडियनऑइलच्या वचनबद्धतेची पुनर्प्रतिष्ठा करतो.



## थोडक्यात पण महत्वाचे

### चेहऱ्यावर फोड आल्याने विवाहितेने संपवलं जीवन; आंबेठाण येथील धक्कादायक घटना

**पिंपरी : दैनिक संध्या**

चेहऱ्यावरील फोडांच्या त्रासामुळे अस्वस्थ झालेल्या विवाहितेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही धक्कादायक घटना मंगळवारी (दि. २१) सायंकाळी आंबेठाण येथे घडली. पती पेट्रोल भरण्यासाठी घराबाहेर गेल्यानंतर अवघ्या अर्ध्या तासात हा प्रकार घडला आहे. अश्विनी असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. पती संदीप यांनी पोलिसांना खबर दिली आहे. अश्विनी यांना त्वचेचा त्रास होऊन चेहऱ्यावर फोड आले होते. त्यामुळे त्या पतीसोबत दवाखान्यात जाणार होत्या. दरम्यान, २१ जुलै रोजी सायंकाळी सातच्या सुमारास अश्विनी यांचे पती संदीप हे पेट्रोल टाकून येतो, असे सांगून दुचाकीवरून आंबेठाण चौक येथे गेले. सायंकाळी साडेसातच्या सुमारास ते परतले असता घराचा दरवाजा आतून बंद होता. वारंवार हाका मारूनही प्रतिसाद न मिळाल्याने सोसायटीतील राकेशकुमार, मंगेश बनकर तसेच इतर रहिवासी जमा झाले. त्यानंतर डायल ११२ वर फोन करून पोलिसांना बोलवण्यात आले. पोलिस आल्यानंतर दरवाजा तोडून घरात प्रवेश केला असता किचनमधील स्लॅबवरील लोखंडी हुकाला सुताची दोरी बांधून अश्विनी पाटील यांनी गळफास घेतल्याचे आढळून आले. त्यांना तातडीने खाली उतरवून रुग्णवाहिकेतून चाकण येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासणीपूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले.

### बांधकाम परवानगी विभागातून फाईली गायब होत असल्याने आर्किटेक्ट त्रस्त

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी: पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या बांधकाम परवानगी विभागात बांधकाम मंजुरीसाठी आर्किटेक्टच्या माध्यमातून बांधकाम व्यावसायिक प्रस्ताव सादर करतात. मात्र, महापालिकेची ई-ऑफिस संगणक प्रणाली गेल्या आठ दिवसांपासून ठप्प झाली आहे. तसेच, सादर केलेल्या फाईली गायब होत आहेत. त्यामुळे वैतागलेल्या आर्किटेक्टकडून आयुक्तांकडे तक्रार करण्यात आली आहे. गृहप्रकल्पास बांधकाम परवानगी विभागाची मंजुरी मिळावी, म्हणून बांधकाम व्यावसायिक प्रस्ताव दाखल करतात. ते काम बांधकाम व्यावसायिकांमार्फत आर्किटेक्ट करतात. मात्र, प्रस्ताव देऊन आठ ते दहा दिवस उलटूनही त्यास मंजुरी मिळत नसल्याने ते त्रस्त झाले आहे. महापालिकेची डीएमएस (डॉक्युमेंट मॅनेजमेंट सिस्टीम) ही ई-ऑफिस प्रणाली गेल्या दहा दिवसांपासून ठप्प आहे. अनेकदा ती संथगतीने सुरू राहते. त्यामुळे ऑनलाईन कामकाज करता येत नाही, असे उत्तर बांधकाम परवानगी विभागाच्या कनिष्ठ अभियंता, उपअभियंता, कार्यकारी अभियंता यांच्याकडून दिले जात आहे. त्यामुळे महापालिकेचा महसूल बुडत असल्याचे चित्र आहे. तसेच, त्या विभागाच्या अभिलेख विभागातून प्रस्तावाच्या फाईली गायब होत आहेत. आर्किटेक्टने शोध घेऊनही फाईल सापडत नाहीत. त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करूनही कोणी दखल घेत नाही. फाईली गायब होत असल्याने आर्किटेक्टसह बांधकाम व्यावसायिक वैतागले आहेत. एकाच कामासाठी आर्किटेक्ट यांना सतत हेलपाटे मारावे लागत आहेत. अधिकारी जागेवर भेटत नाहीत. साईटवर गेलेत, मीटिंगमध्ये आहेत. निवडणूक, जनगणना, मतदार पडताळणी तसेच, आपत्कालीन कामात व्यस्त असल्याचे कारणे दिले जात आहेत. तब्बल चार ते पाच महिने प्रस्ताव पडून राहत असल्याने रोष व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी विभागप्रमुखासह वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करूनही कोणी दखल घेत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे आर्किटेक्ट यांच्यामध्ये असंतोष खदखदत आहे. त्यामुळे वैगातलेल्या सुमारे 30 ते 40 आर्किटेक्ट यांनी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या दालनासमोर गर्दी केली होती. मात्र, ते बैठकीत असल्याने भेटू शकले नाहीत. त्यामुळे त्यांनी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांची भेट घेऊन तक्रार मांडली. महापालिकेची ई-ऑफिस प्रणाली गेल्या आठ दिवसांपासून संथगतीने सुरू आहे. सर्व्हर डाऊन असल्याने प्रस्तावना ऑनलाईन मंजुरी देता येत नाही. त्याबाबत आयुक्तांना कल्पना देण्यात आली आहे. प्रलंबित प्रस्ताव तातडीने मार्गी लावण्यासाठी ऑफलाईन कामकाज करण्याबाबत विचार सुरू आहे. तसेच, आर्किटेक्टच्या इतर तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही केली जात आहे, असे बांधकाम परवानगी विभागाचे सहशहर अभियंता मनोज सेठिया यांनी सांगितले.

### अजब कारभार; अंतर्गत रस्त्यावरील चुकीच्या नामफलकामुळे नागरिकांत संभ्रम

**पिंपरी : दैनिक संध्या**

महापालिकेच्या निवडणुका पार पडल्यानंतर महापालिकेच्या संबंधित विभागाने नामफलक लावण्यास सुरुवात केली आहे. परंतु प्रशासनाचा निष्काळजीपणा पिंपळे गुरवमध्ये समोर आला आहे. येथील प्रभाग क्रमांक ३१ मधील अंतर्गत रस्त्यावर चक्क चुकीचा फलक लावण्यात आल्याने नागरिक मोठ्या संभ्रमात पडले आहेत. पिंपळे गुरवमधील प्रभाग क्रमांक ३१ मधील रामनगर, गजाननगर परिसरात सुमारे तीन आठवड्यांपूर्वी महापालिकेचा लोगो असलेला एक नामफलक अंतर्गत रस्त्याच्या कडेला उभारण्यात आला. गेल्या ३० वर्षांपासून हा रस्ता 'गजाननगर, गल्ली नंबर २' या नावाने परिचित आहे. मात्र, महापालिकेने या फलकावर 'गल्ली नंबर ४' असा उल्लेख केला आहे. प्रशासनाच्या या ढिसाळ कारभारामुळे या भागात येणाऱ्या व्यक्तींना पत्ता शोधताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. चुकीच्या नावाचा संभ्रम कमी होता की काय, म्हणून की प्रशासनाचा आणखी एक गलथानपणा समोर आला आहे. अवघ्या तीन आठवड्यांपूर्वी बसवलेला हा फलक आता कोलमडण्याच्या स्थितीत पोहोचला आहे. त्यामुळे महापालिकेने केलेल्या या कामाच्या निकृष्ट दर्जाबाबत स्थानिक नागरिकांमधून संतप्त सवाल उपस्थित केले जात आहेत. संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घेऊन हा चुकीचा फलक हटवावा आणि त्या जागी मजबूत स्थितीत 'गल्ली नंबर २' चा फलक उभारावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. गजाननगरमध्ये आम्ही गेली तीस वर्षांहून अधिक काळ वास्तव्यास आहोत. गेल्या काही दिवसांपूर्वी नव्याने उभारण्यात आलेला फलक येता-जाता नजरेस पडतो, त्यावर गल्ली नंबर २ ऐवजी गल्ली नंबर ४ असे लिहिले आहे. यामुळे अनेकदा संभ्रम निर्माण होत असल्याने आम्ही याबाबतची माहिती संबंधित प्रशासनाला दिली आहे. याबाबतची माहिती मला नुकतीच मिळाली आहे. सध्या सर्वजण एसआयआरच्या कामकाजात व्यस्त आहेत.

### वल्लभनगर भुयारी मार्ग देतोय अपघाताला निमंत्रण, भुयारी मार्गाची दुरवस्था

**वल्लभनगर: दैनिक संध्या**

शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांमध्ये पाणी साचले होते. वल्लभनगर येथील भुयारी मार्गात पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचल्याने प्रशासनाने हा मार्ग काही काळ वाहतुकीसाठी बंद केला होता. पाण्याचा उपसा करून मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. मात्र, पाणी ओसरल्यानंतर या भुयारी मार्गाची दुरवस्था समोर आली असून, मोठमोठे खड्डे, उघडी पडलेले चेंबर्स आणि गाळाने तुंबलेले पावसाळी नाले यामुळे हा मार्ग अपघातांना निमंत्रण देत आहे. पावसाच्या पाण्यामुळे भुयारी मार्गातील डांबरी रस्ता ठिकठिकाणी उखडला असून, मोठमोठे खड्डे पडले आहेत. रस्त्यावर खडी व माती पसरल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. थोडा पाऊस झाला तरी भुयारी मार्गात पाणीच पाणी होते. विशेषतः दुचाकीस्वार आणि रिक्षाचालकांना खड्डे चुकविताना वाहनावरील ताबा सुटण्याची शक्यता आहे. भुयारी मार्गाच्या कडेला असलेल्या पावसाळी पाणी वाहून जाणाऱ्या नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे.



# पवना धरण १०० टक्के भरले

■ पिंपरी (दै. संध्या)

मावळ तालुक्यातील पवनानगर येथील पवना धरण शुक्रवार (दि. २४) १०० टक्के भरले. पावसाची संततधार आणि धरणात वाढत असलेला पाणीसाठा लक्षात घेऊन धरणातून शुक्रवार सकाळपासून ८०० क्युसेकने विसर्ग करण्यास सुरुवात करण्यात आली आहे, तर तो टप्प्याटप्प्याने विसर्ग वाढत सायंकाळी सातला एकूण ९००० क्युसेकपर्यंत केला जाणार आहे; पात्र फुगल्याने पवना नदीस पूर आला असून, नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

पवना धरण ९३ टक्के भरले; नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

पिंपरी-चिंचवड शहराचे तहान भागविणारे पवना धरण अखेर, शुक्रवारी १०० टक्के भरले. धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये तसेच, घाटमाथ्यावर पाऊस पडत असल्याने धरणात पाणीसाठा वाढतच आहे. पवना धरणातील पाणीपातळी नियंत्रित करण्यासाठी सकाळी नऊपासून पवना नदीपात्रात विद्युतगृहद्वारे ८०० क्युसेकने विसर्ग सुरू करण्यात आला.

धरण क्षेत्रात पावसाची संततधार कायम असल्याने टप्प्याटप्प्याने विसर्ग वाढवण्यात आला. सायंकाळी सातपासून विद्युतगृहातून १४०० क्युसेकने आणि सांडव्यातून ४२०० क्युसेक असे एकूण ५६०० क्युसेकने विसर्ग सुरू करण्यात आला आहे. रात्री आठला एकूण विसर्ग ७००० क्युसेक करण्यात आला. पावसाचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन विसर्ग ९००० क्युसेक इतका केला जाणार आहे. त्यामुळे पवना नदीचे पात्र फुगले असून, ती दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे नदीकाठच्या लोकवस्तीत पाणी शिरण्याचा धोका निर्माण झाला आहे. मागील २४ तासांत एकूण ६८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. सततच्या पावसामुळे ओढे, नाले व नदीच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता आहे. नदीपात्रातील साहित्य, शेतीचे अवजारे, कृषी पंप, जनावरे नदीपात्रासापसून सुरक्षित ठिकाणी इतरत्र हटवण्यात यावेत.

## महापालिका शाळा क्र. ५४ मध्ये पालकांसाठी शेडची प्रतीक्षा

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिका शिक्षणाच्या दर्जाबाबत मोठमोठे दावे करत असली तरी प्रत्यक्षात विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांकडे मात्र प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र पिंपळे गुरव येथील महापालिकेच्या शाळा क्रमांक ५४ मध्ये पहावयास मिळत आहे. महापालिका शाळेच्या आवारात असलेली विद्यार्थ्यांसाठीची खेळणीही तुटलेल्या अवस्थेत असून, त्याकडेही दुर्लक्ष झाल्याचे दिसत आहे.

येथील प्रशालेमध्ये परिसरातील सर्वसामान्य कुटुंबांतील शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दररोज सकाळी विद्यार्थ्यांना शाळेत सोडण्यासाठी आणि दुपारी शाळा सुटल्यानंतर त्यांना घरी घेऊन जाण्यासाठी पालक मोठ्या संख्येने शाळेच्या आवरात येतात. मात्र, त्यांच्यासाठी उभे राहण्यासाठी साधे शेडदेखील उपलब्ध नसल्याने पावसाळ्यात पालकांना अक्षरशः शाळा सुटेपर्यंत पावसात भिजत ताटकळत उभे रहावे लागत आहे. विशेष म्हणजे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान भावंडांना सोबत घेऊन येणाऱ्या पालकांची सर्वाधिक गैरसोय होत आहे. पाऊस सुरू झाल्यानंतर आसरा घेण्यासाठी कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे अनेकांना झाडाखाली किंवा इमारतीच्या कडेला उभे राहण्याची वेळ येते. त्यामुळे अपघाताची शक्यता निर्माण होत असून, पालकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. कोट्यवधी रुपयांची विकासकामे करणाऱ्या महापालिकेला विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी काही लाख रुपयांचे शेड उभारणे अशक्य आहे का? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांच्या हिताचा व विरंगुळ्याचा विचार करताना महापालिका शाळेच्या आवारात असलेली विद्यार्थ्यांसाठीची खेळणीही तुटलेल्या अवस्थेत असून, त्याकडेही दुर्लक्ष झाल्याचे दिसत आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेने तातडीने शाळा क्रमांक ५४ च्या आवारात किंवा प्रवेशद्वाराजवळ कायमस्वरूपी प्रशस्त शेड उभारून पालकांना पाऊस व उन्हापासून संरक्षण मिळेल.

## हिंजवडी ते बालेवाडी मेट्रो सेवेला हिरवा कंदील

■ पिंपरी (दै. संध्या)

हिंजवडी आयटी पार्कला शहराशी जोडणाऱ्या पुणे मेट्रो मार्गिका-३च्या प्रवासी सेवेचा मार्ग आता अधिकृतरीत्या मोकळा झाला आहे. नागरी विमान वाहतूक मंत्रालयांतर्गत कार्यरत मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी (सीएमआरएस) माण स्थानक ते आर. के. लक्ष्मण म्युझियम (बालेवाडी) या १२ स्थानकांदरम्यानच्या टप्प्यावर प्रवासी वाहतूक सुरू करण्यासाठी २३ जुलै रोजी तात्पुरते प्राधिकरण प्रदान केले आहे.

या मंजुरीमुळे सीबीटीसी सिग्नलिंग प्रणालीअंतर्गत 'एटीपी' मोडवर मेट्रो ताशी ८० किलोमीटर या कमाल वेगाने धावू शकणार आहे. सर्व वैधानिक तपासण्या, चाचण्या आणि सुरक्षा मानकांची पूर्तता झाल्यानंतरच ही मंजुरी देण्यात आली आहे. सुमारे १३ किलोमीटर लांबीचा हा दुहेरी मार्ग ७५० व्होल्ट डीसी थर्ड रेल ट्रॅक्शन प्रणालीवर कार्यरत राहणार आहे. मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी ५ ते ८ जुलै या कालावधीत 'पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड' च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या मार्गाची सखोल पाहणी केली होती. आढाव्यादरम्यान सुरक्षा आयुक्तांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांवरील अहवाल कंपनीने सादर केला.

## महापालिका भवनात अजितदादा पवार, लक्ष्मण जगताप यांची तैलचित्रे

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिका भवनाच्या दर्शनी भागात तळमजल्यावर दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे तैलचित्र झळकणार आहे. तसेच, भाजपाचे दिवगंत आमदार लक्ष्मण जगताप यांचेही तैलचित्र लावले जाणार आहे. उमेद मान्यतेवर महापालिका भवनातील यशवंतराव चव्हाण सभागृहात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे तैलचित्र लावण्यात येणार आहे. त्यासह विविध कामांच्या खर्चाला स्थायी समितीने बुधवार (दि. २२) मान्यता दिली आहे.

सभेच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे होते. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच, दिवगंत आमदार लक्ष्मण जगताप यांचेही तैलचित्र महापालिकेच्या दर्शनी भागात लावण्यास सर्वसाधारण सभेने १३ मार्च २०२६ ला मंजुरी दिली आहे. तर, महापौर रवी लांडगे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे तैलचित्र सभागृहात लावण्याची विनंती १८ मे २०२६ च्या पत्राद्वारे केली आहे. त्याला अद्याप सर्वसाधारण सभेची मान्यता नाही.

## पिंपरी-चिंचवड डीपी प्लानवर ५६ हजार हरकती

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सुधारित प्रारुप विकास योजना आराखड्यावर (डीपी प्लान) प्राप्त झालेल्या तब्बल 56 हजार 771 हरकती प्राप्त झाल्या आहेत. त्यावर आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात लवकरच सुनावणी घेण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेचा नगर रचना विभाग तेथे हलविण्यात येणार असून, मोठे व लहान असे दोन्ही नाट्यगृह तब्बल सहा महिने बंद ठेवण्यात येणार आहे. त्या काळात कोणालाही नाट्यगृह भाड्याने दिले जाणार नाही.

महापालिकेकडून सुधारित प्रारुप विकास योजना आराखडा 15 मे 2025 ला प्रसिद्ध करण्यात आला. त्यावर 14 जुलै 2025 पर्यंत हरकती व सूचना स्वीकारण्यात आल्या. त्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. तब्बल 56 हजार 779 जणांनी हरकती नोंदवल्या आहेत. हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी समिती स्थापन करण्यास महापालिका सर्वसाधारण सभेने 15 मे 2026 ला मान्यता दिली आहे. त्यामुळे लवकरच सुनावणी प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. सुनावणी सुरू करण्यापूर्वी हरकत नोंदवलेल्या नागरिकांना टपालाने नोटीस पाठवून सुनावणीचे ठिकाण, वेळ व दिनांक कळवण्यात येते; तसेच सुनावणीच्या वेळी हरकतदारांच्या उपस्थितीच्या नोंदी घेण्यासाठी याद्या तयार करण्याचे काम बाकी आहे. सुनावणीसाठी आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह 1 जुलै ते 31 डिसेंबर असे सहा महिन्यांसाठी आरक्षित करण्यात आले आहे. त्या काळात नाट्यगृह कोणालाही भाड्याने दिले जाणार नाही. त्यामुळे तेथे कोणतेही कार्यक्रम होणार नाहीत. सुनावणी प्रक्रियेसाठी तेथे आवश्यक फर्निचर, टेबल व स्टेशनरी साहित्य उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत; तसेच नगररचना विभागाचे उपसंचालक, नगररचनाकार, सहाय्यक नगररचनाकार, कनिष्ठ आरेखक, वरिष्ठ लिपिक, कंत्राटी लिपिक, कंत्राटी तांत्रिक व्यक्तीची नेमणूक केली जाणार आहे.

# रेड झोनची हद्द कमी करा, हजारो कुटुंबांना दिलासा द्या

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक भागांना रेड झोनचा फटका बसला आहे. मोठ्या प्रमाणात लोकवस्ती वाढल्याने रेड झोनची हद्द कमी करून, हजारो कुटुंबांना दिलासा द्यावा, असे साकडे महापौर रवी लांडगे यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना घातले आहे. या प्रकरणी कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी त्यांनी केली आहे. प्रत्यक्ष पिंपरी-चिंचवड शहराला भेट देऊन परिस्थितीची पाहणी करण्याचे निमंत्रणही देण्यात आले आहे.

शहराच्या सर्वांगीण व वेगवान विकासासाठी महापौर लांडगे यांनी शुक्रवारी (दि.24) दिल्ली दौरा केला. केंद्र सरकारसमोर शहराशी संबंधित महत्त्वाचे विषय प्रभावीपणे मांडत विकासाचा व्यापक रोडमॅप सादर केला. नागरिकांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांना न्याय मिळावा, शहराला केंद्र शासनाच्या विविध योजनांचा अधिकाधिक लाभ मिळावा, या उद्देशाने त्यांनी विविध केंद्रीय मंत्र्यांच्या भेटी घेऊन चर्चा केली. महापौर लांडगे यांनी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेऊन पिंपरी-चिंचवडमधील रेड झोनचा गंभीर प्रश्न मांडला. संरक्षण विभागाच्या निर्बंधांमुळे शहरातील लाखो नागरिकांना बांधकाम परवानग्या, पुनर्विकास, मालमत्ता व्यवहार, बँक कर्जे तसेच, विविध विकासकामांमध्ये येणाऱ्या अडचणींची माहिती त्यांनी दिली. या प्रश्नावर संरक्षण मंत्रालय, महाराष्ट्र शासन, संरक्षण प्राधिकरण आणि पिंपरी-चिंचवड महापालिका यांच्या संयुक्त बैठकीद्वारे नागरिकांना दिलासा देणारा कायमस्वरूपी तोडगा काढण्यात यावा. प्रत्यक्ष पिंपरी-चिंचवड शहराला भेट देऊन परिस्थितीची पाहणी करण्याचे निमंत्रणही त्यांना महापौरांनी दिले.



यानंतर केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग आठ पदरीकरणासाठी प्रलंबित भूमी संपादन प्रक्रिया तातडीने पूर्ण करून, प्रकल्पाच्या कामास गती देण्याची मागणी करण्यात आली. भोसरी येथील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल तांत्रिकदृष्ट्या शक्य असल्यास कायम ठेवण्यात यावा. मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला तातडीने सुरुवात करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली.

दौऱ्यात केंद्रीय एमएसएमई मंत्री जितराम मांझी यांचे प्रमुख सल्लागार संदीप पोखरकर यांच्यासोबतही चर्चा झाली. पिंपरी-चिंचवड शहरात महिला औद्योगिक क्लस्टर उभारण्यासाठी केंद्र शासनाचे सहकार्य मिळावे. महिलांना उद्योग-व्यवसायात मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध व्हाव्यात. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी विशेष निधी, प्रशिक्षण आणि तांत्रिक मार्गदर्शन मिळावे, याबाबत चर्चा करण्यात आली. केंद्रीय युवा व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्यासोबतच्या बैठकीत पिंपरी-चिंचवडमध्ये महापौर चषक ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. शहरासाठी स्वतंत्र आणि सर्वसमावेशक क्रीडा धोरण तयार करण्यासाठी मार्गदर्शन, खेलो इंडिया आणि फिट इंडिया अभियानांतर्गत आर्थिक व तांत्रिक मदत उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### स्व. अशा भोसलेंवरील विशेषांकाचे उषा मंगेशकर यांच्या हस्ते प्रकाशन

पुणे (दैनिक संध्या) : कोट्यावधी रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या गानकोकीळा पद्मविभूषण स्व. अशा भोसले यांच्यावरील 'स्वरप्रतिभा' मासिकाचा 'देशो देशी पानो-पानी अशा अशा' या विशेषांकाचे प्रकाशन ज्येष्ठ पार्श्वगायिका उषा मंगेशकर यांच्या हस्ते सोमवार दि. २७ जुलै रोजी दुपारी १२.३० वाजता बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे संपन्न होणार आहे. या प्रसंगी ज्येष्ठ विचारवंत व माजी आमदार उल्हास पवार अध्यक्षस्थान भूषवणार असून, ज्येष्ठ निवेदक सुधीर गाडगीळ आणि पुणे म.न.पा. काँग्रेस पक्ष गटनेते ॲड. रामचंद्र उर्फ. चंदूशेठ कदम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. ज्येष्ठ निवेदिका नीरजा आपटे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करतील. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या प्रेरणेतून व सहयोगातून या विशेषांकाची निर्मिती करण्यात आली आहे अशी माहिती संयोजक स्वरप्रतिभाचे संपादक प्रवीण प्र. वाळिंबे यांनी दिली. या कार्यक्रमात प्रारंभी सौ. तन्मयी मेहेंदळे - कुलकर्णी शिव-स्तवन सादर करणार असून तबला साथ- जयराज हुंडेकरी आणि संवादिनी संगत- सुदिन जोशी करणार आहेत. प्रकाशनानंतर आशाताईंच्या गाजलेल्या अवीट मराठी व हिंदी गाण्यांच्या 'स्वरस्वामिनी आशा' हा मराठी व हिंदी गाण्यांचा कार्यक्रम प्रख्यात गायिका मनीषा निश्चल व जितेंद्र पेटकर सादर करणार असून याचं निवेदन रवींद्र खरे करणार आहेत. त्यांना अमन सय्यद-किबोर्ड, चिंतन मोढा-किबोर्ड, हर्षद गणबोटे-तबला, आसिफ खान-ऑक्टोपॅड, मोहनिश निश्चल-गिटार आणि आशिष राखे (साऊंड) हे साथ देतील. हा संपूर्ण कार्यक्रम रसिकांसाठी विनामूल्य आहे. याच्या मोफत प्रवेशिका बालगंधर्व रंगमंदिर येथे तिकीट विक्री खिडकीवर दि. २३ जुलै पासून उपलब्ध असतील. प्रथम येणाऱ्यास प्राधान्य दिले जाईल. 'स्वरप्रतिभा' स्व. आशा भोसले विशेषांक यावेळी सवलतीत उपलब्ध असेल. स्व. आशाताईंवरील विविध वृत्तपत्रांतील अग्रलेख, त्यांच्या निधनानंतर देशभर विविधभाषिक वृत्तपत्रांच्या पहिल्या पृष्ठावर प्रकाशित झालेल्या तसेच जगातील प्रमुख ५० देशांमधील प्रमुख दैनिकांमध्ये प्रकाशित झालेल्या बातम्या व लेख, स्व. आशाताईंचे विविध नामवेतांसमवेतचे असंख्य फोटो आणि आशाताईंनी गायलेल्या निवडक हिंदी व मराठी लोकप्रिय गाण्यांची गीतकार, संगीतकार, चित्रपट व वर्ष यांची अल्फाबेटीकल सूची यांचा या २२५ पृष्ठांच्या विशेषांकात समावेश आहे.

### किशोर भोसले यांनी केला सेवा प्रकल्प प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प

चाकण : शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, युवा कौशल्य विकास, रक्तदान, डिजिटल शिक्षण व विविध समाजोपयोगी सेवा प्रकल्प अत्यंत प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प चाकण रोटरी क्लबचे अध्यक्ष किशोर भोसले यांनी केला आहे. चाकण रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी किशोर भोसले यांची, तर डॉ. भरत राऊत यांची सचिव पदी आणि डॉ. विजय भवारी यांची कोषाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी उद्योजक भोसले यांनी वरील संकल्प केला. याप्रसंगी रोटरी ३१३१ चे जिल्हा प्रांतपाल नितीन ढमाले, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, नगराध्यक्षा मनिषा गोरे, सहाय्यक प्रांतपाल शिवाजी टाकळकर, डॉ. नीलम ढमाले, डॉ. विद्या भोसले, डॉ. पल्लवी बेनके, सुवर्णा गोरे, डॉ.भूषण नाईक, डॉ. प्रज्ञा भवारी, डॉ. भरत राऊत आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. किशोर भोसले यांनी यावेळी सांगितले की," चाकण शहरात सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहे. रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, नेत्र शिबिर, वृक्षारोपण, शालेय साहित्यांचे वाटप, व्याख्यानमाला, अनाथांना मदत, सुलभ शौचालय सुरू करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. डॉ. भूषण नाईक यांनी आभार मानले.

### न्यू इंग्लिश स्कूल येथे स्व.अजितदादा पवार यांची जयंती उत्साहात साजरी

वडगाव कांदळी:- न्यू इंग्लिश स्कूल, नगदवाडी येथे महाराष्ट्राचे मा. उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. दीपक घाडगे हे उपस्थित होते. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व.अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी स्व.अजितदादा पवार यांच्या कार्याचा आढावा घेत मनोगत व्यक्त केले. तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. दीपक घाडगे यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या नेतृत्वगुणांबाबत, विकासाभिमुख कार्याबाबत आणि समाजाप्रती असलेल्या योगदानाबाबत मार्गदर्शन केले. उपस्थित शिक्षकांनीही आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी विचार दिले. कार्यक्रमाचे नियोजन व संचालन विद्यालयातील शिक्षकांच्या सहकार्याने करण्यात आले. शेवटी उपस्थित सर्वांनी स्व.अजितदादा पवार यांना जयंतीनिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### व्हि. जे स्कूलमध्ये विद्यार्थी परिषद निवडणूक उत्साहात संपन्न

वडगाव कांदळी :- विशाल जुन्नर सेवा मंडळ संचलित व्ही. जे. इंटरनॅशनल स्कूल, नगदवाडी,कांदळी येथे विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुणांचा विकास, लोकशाही मूल्यांची जोपासना आणि शाळा व्यवस्थापनात सक्रिय सहभाग वाढावा या उद्देशाने विद्यार्थी परिषद निवडणूक २०२६–२७ उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध व लोकशाही पद्धतीने यशस्वीरित्या संपन्न झाली. या विद्यार्थी परिषद निवडणुकीचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. जयश्री तांगतोडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच समन्वयिका सौ. जयश्री कुंजीर व सौ. श्वेता कोकणे यांच्या सहकार्याने आणि सर्व शिक्षकांच्या नियोजनबद्ध सहभागातून करण्यात आले. या निवडणूक प्रक्रियेमध्ये हेड बॉय ,हेड गर्ल ,कॅप्टन, व्हॉइस कॅप्टन या विविध पदांसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी नामनिर्देशन अर्ज सादर केले. त्यानंतर उमेदवारांनी प्रचाराच्या माध्यमातून आपले विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले, आकर्षक पोस्टर्स तयार केले तसेच लोकशाही पद्धतीने जनसंपर्क साधत विद्यार्थ्यांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शिस्तबद्ध आणि लोकशाही मूल्यांना अनुसरून राबविण्यात आली. निवडणुकीचे नियोजन व अंमलबजावणी शिक्षक समितीने निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अत्यंत जबाबदारीने पार पाडली. या निवडणूक प्रक्रियेदरम्यान विशाल जुन्नर सेवा मंडळाचे सन्मा. विश्वस्त श्री विक्रांत काळे सर यांनी देखील आपली उपस्थिती दर्शविली. मतदानाच्या दिवशी विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध रांगेत उभे राहून आपला मतदानाचा हक्क बजावला. गोपनीयतेच्या तत्त्वाचे काटेकोर पालन करत प्रत्येक विद्यार्थ्याने मतपत्रिकेद्वारे मतदान केले. मतदान प्रक्रिया अत्यंत शांततापूर्ण, पारदर्शक आणि यशस्वीरीत्या पूर्ण झाली. या मतदानानंतर मतमोजणीची प्रक्रिया पारदर्शक व निःपक्षपातीपणे पार पाडून विद्यार्थी परिषदेचा निकाल लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना लोकशाही व्यवस्थेचे महत्त्व, जबाबदारीची जाणीव, निर्णयक्षमता, प्रचार कौशल्य, नेतृत्वगुण, संघभावना आणि प्रामाणिकपणे निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याचे प्रत्यक्ष अनुभव मिळाले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी लोकशाही शिक्षणाचा एक प्रेरणादायी अनुभव ठरला.



## जुन्नर तालुक्यातील नगदवाडी शाळेत आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळ्याचे उत्साहात आयोजन

**नारायणगाव (दै. संध्या)**

नगदवाडी ता.जुन्नर,जि. पुणे येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेत आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळ्याचे उत्साहात आयोजन करण्यात आल्याची माहिती केंद्रशाळेच्या मुख्याध्यापिका उज्वला बोऱ्हाडे यांनी दिली.

विद्यार्थ्यांनी आकर्षक वारकरी वेशभूषा करून डोक्यावर तुळस,हातात टाळ व भगव्या पताका घेऊन भक्तीमय वातावरणात गावातून दिंडी काढली.

शाळेतून निघालेली दिंडी गावातील प्रमुख मार्गावरून जात असताना पुणे जिल्हा परिषद पुणेच्या विद्यमान सदस्या कल्पनाताई वैभवशेठ काळे व शिरूर लोकसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे अध्यक्ष वैभवशेठ काळे यांनी स्वतःहून गाडी थांबवून विद्यार्थ्यांसोबत फोटो काढत दिंडी उपक्रमाचे कौतुक केले व दिंडी सोहळ्याला शुभेच्छा दिल्या.

वारीमध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेले रिंगण,टाळ्यांचा गजर,भजन,गवळण,अभंग व ज्ञानोबा माऊली तुकाराम च्या जयघोषांनी वातावरण दुमदुमून निघाले.

कार्यक्रमानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना गोड जेवणाची व्यवस्था करण्यात आली तसेच सर्वांना केळी व खाऊचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शाळेतील शिक्षक मंगेश मेहेर,पंडित चौगुले,निलेश शेलार,विद्या वाघ,आशा आरेकर,उज्वला कांबळे,स्मिता काळे यांनी केले.



## खेड तालुक्यातील तीनही धरण भरले
## चासकमान धरण शंभरी कडे

**राजगुरूनगर (दै. संध्या)**

खेड तालुक्यातील चासकमान धरण ९९ टक्के भरले असून , शुक्रवारी दुपारी दोन वाजता धरणाच्या पाचही दरवाजांतून भीमा नदीपात्रात २९७९३ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे.

धरण परिसरात पावसाचा जोर कायम असल्याने धरणातील विसर्गात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून भीमानदी काठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.अशी माहिती चास कमान पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता एम. टी. जाधवर यांनी सांगितले.

तालुक्याच्या पश्चिम भागात संततधार पावसाचा जोर कायम असल्याने धरणातील पाणी साठा सातत्याने वाढत आहे.सधस्थितीत चास कमान धरण शंभरी कडे जात असल्याने गेली चार पाच दिवसापासून प्रशासनाकडून टप्प्याटप्प्याने पाण्याचा विसर्ग भीमा नदी पात्रात होत आहे.आज शुक्रवारी चासकमान धरणाची पातळी ९९टक्क्यांवर गेल्याने दुपारी दोन वाजता सांडव्या द्वारे २९७९३ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे. त्यामुळे भीमा नदीवरील कोल्हापूर टाईप बंधारे पाण्याखाली आले आहे.खेड तालुक्यातील चासकमान धरणाबरोबर भामा आसखेड, कलमोडी धरणातही मोठ्या प्रमाणात पाण्याची वाढ झाली आहे.

पाणलोट क्षेत्रातील पर्जन्यमान विचारात घेऊन धरणातील पाणीसाठा नियंत्रित ठेवण्यासाठी धरणाच्या सांडव्या वरून भीमा नदी पात्रामध्ये पाणी सोडण्यात येत असल्याने

भीमा नदी काठच्या सर्व नागरीकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून कोणीही नदीपात्रात उतरू नये. तसेच नदी मधील पाण्याचे पंप, नदी काठचे शेती अवजारे व तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास ती तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यावेत असे आवाहन चासकमान पाटबंधारे विभाग कडून करण्यात आहे.

## वृक्षारोपण हा समृद्ध पर्यावरण निर्माण करण्याची चळवळ



**चाकण (दै. संध्या)**

वृक्षारोपण हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून भावी पिढ्यांसाठी सुरक्षित आणि समृद्ध पर्यावरण निर्माण करण्याची चळवळ असल्याचे विचार माजी आमदार दिलीप मोहिते यांनी व्यक्त केले.

मेदनकरवाडी पंचायत समिती गणातील कडाचीवाडी, रासे व मेदनकरवाडी येथे स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त दिलीप मोहिते यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खेड पंचायत समितीचे सदस्य महेंद्र मेदनकर, उद्योजक उल्हास मेदनकर, कैलास सांडभोर, संध्या जाधव, पल्लवी भुजबळ, उत्तम आगरकर, हेमंत भुजबळ, दत्तात्रय शिवले, ज्ञानेश्वर कड, पप्पू टोपे, श्याम कड, मनोज खांडेभराड, आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोहिते पुढे म्हणाले, " पर्यावरणाची हानी वाढत चालली असून, ती रोखणे गरजेचे आहे. प्रत्येकाने एक तरी झाड लावले पाहिजे. झाड हेच मुलांच्या भविष्याची मोठी गुंतवणूक आहे. माझे वृक्ष, माझी जबाबदारी ही भावना प्रत्येकाच्या मनात रुजली पाहिजे.

## रांजणगाव सांडस बेटाचा संपर्क तुटला

**रांजणगाव सांडस (दै. संध्या)**

पुणे जिल्ह्यातील खडकवासला, डिंभे, चासकमान आणि भामा-आसखेड धरण परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे धरणांमधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. या विसर्गामुळे मुळा, मुठा आणि भीमा नदीच्या पाणीपातळीत लक्षणीय वाढ झाली असून शिरूर आणि दौंड तालुक्यातील अनेक बंधारे पाण्याखाली गेले आहेत. मुळा, मुठा आणि भीमा नद्यांचा संगम असलेल्या रांजणगाव सांडस बेट परिसरातील वाळकी-देलवडी जोडणारा पूल सलग दुसऱ्या दिवसाही पाण्याखाली राहिल्याने या भागातील नागरिकांचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे.

पुलावर पुणे शहरातून वाहून आलेला प्लास्टिक कचरा, थर्माकोल आणि जलपर्णी मोठ्या प्रमाणात अडकल्याने पुलाच्या सुरक्षिततेबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे.

## स्व. आ. गोरे विद्यालयात ग्लोबल दिंडी आषाढी वारी सोहळा संपन्न

**चाकण (दै. संध्या)**

स्व.गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मिडीयम स्कुल, स्व.आ. सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज मध्ये ग्लोबल आषाढीवारी दिंडी सोहळा मोठ्या दिमाखात संपन्न झाला.




ज्ञानोबा माऊली तुकाराम, पुंडलिक वरदा हरी विठ्ठल या गजरात पालखी व विठ्ठल रुक्मिणी यांचे पूजन नगराध्यक्षा मनिषा सुरेशभाऊ गोरे व संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त शिक्षक विजयकुमार तांबे, नारायण करपे, समाजसेविका अनिता गोरे, मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्रिंसिपल माधुरी गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, सविता कुमकर, ज्योती अनप, प्रेरणा काळे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मुलांनी पांडुरंग, रुख्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत मुक्ताई, संत चांगदेव, संत सावतामाळी तसेच वारकरी यांच्या वेशभूषा केल्या होत्या. शिक्षक अर्चना माळी, उर्मिला कोबल, आरती काब्दे यांनी मुलांकडून ज्ञान, भक्ती आणि संस्कार संगम असलेली शाळा स्तरीय लंडन ते पंढरपूर या ग्लोबल दिंडीची प्रतिकात्मक वारी करून घेतली. तसेच सर्व शिक्षक यांनी आळंदी, देहू ते पंढरपूर पालखी मार्ग यामध्ये विशेष दिवे घाटातून पालखी मार्गस्थ होत असल्याचा नयन रम्य इको फ्रेंडली देखावा तयार केला. मुलांना पालखी मार्गाचे दर्शन घडविण्यात आले.

## स्व. नामदार जगताप यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण, पालक मेळावा

**जेजुरी (दै. संध्या)**

श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित न्यू इंग्लिश स्कूल, जवळार्जुन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. नामदार चंदुकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण, पालक मेळावा आणि विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची भावना रुजविण्यासाठी आर्मी युनिटची स्थापना अशा विविध उपक्रमांचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.

शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी सकाळी ८.०० वाजता संस्थेचे हितचिंतक व सल्लागार ॲड. महेशजी राणे यांच्या अध्यक्षतेखाली इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांच्या पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक सतीश पिसाळ यांनी उपस्थित पालकांचे स्वागत करून संस्थेची शैक्षणिक वाटचाल, शाळेचे वार्षिक नियोजन, विविध विद्यार्थी विकास उपक्रम, विद्यार्थ्यांची सुरक्षा, आरोग्य, शिस्त तसेच पालकांच्या सहभागाचे महत्त्व याबाबत सविस्तर



मार्गदर्शन केले. यावेळी पालकांनी विद्यालयाच्या सर्व उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन विद्यालयाच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

यानंतर क्रीडा शिक्षक प्रदीप खोमणे यांनी विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, शिस्त व मातृभूमीप्रती निष्ठा निर्माण व्हावी या उद्देशाने विद्यालयात आर्मी युनिटची स्थापना करण्यात येत असल्याची घोषणा केली. या उपक्रमाचे उपस्थित पालकांनी उत्स्फूर्त स्वागत केले.

पालक मेळाव्यानंतर विद्यालय परिसर तसेच गावातील मंदिर परिसरात ग्रामस्थ, पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या सहभागातून आंबा, चिंच, वड व पिंपळ या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या अभिनव उपक्रमाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, पश्चिम महाराष्ट्र भाजपचे सरचिटणीस व संस्थेचे सचिव माजी आमदार संजयजी (चंदूकाका) जगताप, भारतीय प्रशासन सेवा अधिकारी व संस्थेचे विशेष सल्लागार डॉ. राजेंद्रबापू जगताप, संस्थापक सचिव डॉ. एम. एस. जाधव, सहसचिव दत्तात्रय गवळी, समन्वयिका सोनालीताई शिंदे, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा व विश्वस्त सौ. राजवर्धनीताई जगताप, भारती विद्यापीठाच्या संचालिका व विश्वस्त डॉ. अस्मिताताई जगताप, तसेच व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे आणि रवींद्रपंत जगताप यांनी विद्यालयाचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### राजापूरात अल्पवयीन मुलीवर अत्याचार; 28 वर्षीय तरुणाला अटक

राजापूर : तालुक्यातील एका गावात अल्पवयीन मुलीच्या घरात घुसून तिच्यावर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना २२ जुलै रोजी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणी राजापूर पोलिसांनी तातडीने कारवाई करत २८ वर्षीय संशयिताला अटक केली आहे. त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच पॉक्सो (POCSO) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नरेश काशीराम गुरव (वय २८, रा. तळवडे, ता. राजापूर) याने पीडित अल्पवयीन मुलीच्या घरात घुसून तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. घटनेनंतर पीडितेने राजापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रार मिळताच पोलिस निरीक्षक अमित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तात्काळ तपास सुरू करून आरोपीचा शोध घेत त्याला अटक केली. या कारवाईत पोलिस उपनिरीक्षक सुधीर उबाळे, रायपाटण पोलिस दूरक्षेत्राचे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक दत्ताराम बाणे, पोलिस कॉन्स्टेबल निलेश कात्रे, स्वप्नील घाडगे आणि रामदास पाटील यांनी सहभाग घेतला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ७४, ७५(२), ७६ तसेच पॉक्सो (POCSO) कायद्याच्या कलम ८ व १२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### रत्नागिरीत थकित वीजबिल वसुलीमुळे देखभाल रखडली!

रत्नागिरी : महावितरणचे तांत्रिक कर्मचारी थकित वीजबिल वसुलीच्या कामात गुंतल्याने दैनंदिन देखभाल व दुरुस्तीची कामे रखडत असून त्याचा फटका रत्नागिरी शहरातील वीज ग्राहकांना बसत आहे. आठवडाभर प्रलंबित राहिलेली देखभाल व दुरुस्तीची कामे दर सोमवारी एकत्रितपणे केली जात असल्याने शहरातील अनेक भागांचा वीजपुरवठा सलग पाच ते सहा तास बंद ठेवावा लागत आहे. महावितरणवर वीज निर्मिती कंपन्यांना नियमित देयके अदा करण्याचा ताण असल्याने थकित वीजबिलांची वसुली वेगाने करण्याचे आदेश वरिष्ठ स्तरावरून दिले जात आहेत. परिणामी अभियंत्यांपासून तांत्रिक कर्मचाऱ्यांपर्यंत सर्व यंत्रणा वसुली मोहिमेत गुंतली आहे. तांत्रिक कर्मचाऱ्यांना दिवसभर ग्राहकांकडे जाऊन थकित वीजबिल वसूल करणे किंवा थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याची जबाबदारी दिली जात असल्याने नियमित देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यासाठी वेळ मिळत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे आठवडाभर प्रलंबित राहिलेली कामे दर सोमवारी सकाळी ९ ते दुपारी ३ या कालावधीत हाती घेतली जातात. या कालावधीत शहरातील विविध भागांतील वीजपुरवठा बंद ठेवण्यात येत असल्याने नागरिक, व्यापारी, उद्योग तसेच कार्यालयीन कामकाजावर परिणाम होत आहे. दर सोमवारी एबी स्विचची देखभाल, जंपर बाइंडिंग, ऑइलिंग, ग्रीसिंग, ट्रान्सफॉर्मरची देखभाल, तुटलेले स्टे जोडणे, सैल झालेल्या ओव्हरहेड वीजवाहिन्या ताणणे, जळालेले फ्यूज बदलणे, डीपी बॉक्सची दुरुस्ती आदी कामे केली जात आहेत. मात्र ही कामे नियमितपणे होत नसल्याने एकाच दिवशी मोठ्या प्रमाणात वीजपुरवठा बंद ठेवावा लागत असल्याची स्थिती आहे.

### राजापूर रेल्वे स्थानकातील सिलिंग कोसळले!

राजापूर : कोकण रेल्वे मार्गावरील राजापूर रोड रेल्वे स्थानकातील प्रवासी प्रतीक्षालयाचे सिलिंग मंगळवारी रात्री साडेनऊच्या सुमारास अचानक कोसळल्याने एकच खळबळ उडाली. सुदैवाने त्याचवेळी मुंबईकडे जाणारी कोकणकन्या एक्सप्रेस स्थानकात येणार असल्याने प्रतीक्षालयात थांबलेले सर्व प्रवासी प्लॅटफॉर्मवर गेले होते. त्यामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली, अन्यथा सिलिंगखाली प्रवासी अडकून मोठी दुर्घटना घडली असती. घटनेनंतर स्थानक परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.कोसळलेल्या सिलिंगखाली कोणी अडकले नाही ना, याची तातडीने खातरजमा करण्यात आली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी या घटनेमुळे स्थानकाच्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राजापूर विभागातील अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. तसेच कोसळलेल्या सिलिंगच्या दुरुस्तीसाठी यंत्रणा तत्काळ कामाला लावण्यात आली. मात्र गेल्या दोन वर्षांत दुसऱ्यांदा अशा प्रकारची घटना घडल्याने स्थानकावरील विकासकामांच्या दर्जाबाबत प्रवासी व नागरिकांमध्ये साशंकता निर्माण झाली आहे. दोन वर्षांपूर्वी शासनाच्या पर्यटन विकास योजनेअंतर्गत सुमारे दोन कोटी रुपयांचा निधी खर्च करून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राजापूर रोड रेल्वे स्थानकाचे सुशोभिकरण व आधुनिकीकरण करण्यात आले होते. या कामांमुळे स्थानकाचा चेहरा-मोहरा बदलला असला, तरी काम सुरू असतानाच एकदा छप्पर कोसळल्याची घटना घडली होती. त्यावेळीही बांधकामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. आता पुन्हा प्रतीक्षालयाचे सिलिंग कोसळल्याने त्या शंकांना अधिक बळ मिळाले आहे. विशेष म्हणजे हे बांधकाम पूर्ण होऊन अवघी दोन वर्षे उलटली असताना अशी घटना घडल्याने कामाच्या दर्जाबाबत आणि देखभाल व्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. लाखो रुपये खर्चून करण्यात आलेल्या विकासकामांची गुणवत्ता नेमकी कितपत सक्षम आहे, याची चौकशी होणे आवश्यक असल्याची भावना प्रवाशांमधून व्यक्त होत आहे.

### पुण्यात 'NVIDIA GeForce Day 2026'ला उत्स्फूर्त प्रतिसाद





पुणे (दै. संध्या) : कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), गेमिंग आणि सर्जनशील तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील नव्या संधींची ओळख करून देणाऱ्या NVIDIA GeForce Day 2026 चे पुण्यातील मेस्से ग्लोबल कन्व्हेन्शन सेंटर येथे उत्साहात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थी, क्रिएटर्स, डेव्हलपर्स आणि गेमर्सचा मोठा प्रतिसाद मिळाला असून, पुण्यातील प्रमुख अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील ६ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमात NVIDIA च्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. उपस्थितांना नवीन GeForce RTX 50 मालिका लॅपटॉप आणि डेस्कटॉपचा अनुभव घेण्याबरोबरच RTX AI अनुभव विभागात कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित विविध कार्यपद्धती जाणून घेण्याची संधी मिळाली. स्थानिक पातळीवरील AI विकासासाठी तयार करण्यात आलेल्या NVIDIA च्या वैयक्तिक AI सुपरकॉम्प्युटर 'DGX Spark' चे थेट प्रात्यक्षिकही विशेष आकर्षण ठरले. कार्यक्रमात कोडिंग चॅलेंज, क्रिएटर कार्यशाळा, कॉस्पले स्पर्धा, गेमिंग डेमो तसेच AI आधारित तंत्रज्ञानाचे विविध प्रत्यक्ष अनुभव आयोजित करण्यात आले होते. NVIDIA आणि Ubisoft यांच्या तज्ज्ञांनी एजेंटिक AI, RTX आधारित क्रिएटिव्ह कार्यपद्धती आणि गेम डेव्हलपमेंटच्या भविष्यावर मार्गदर्शन केले. "GeForce Day ही मालिका विद्यार्थ्यांना उत्कृष्ट हार्डवेअरच्या माध्यमातून काय शक्य होऊ शकते, याचा प्रत्यक्ष अनुभव देण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आली आहे. उच्च दर्जाचे गेमिंग, AI सोबत कोडिंग, एजेंटिक AI किंवा कंटेंट क्रिएशन अशा विविध क्षेत्रांत AI-संचलित RTX प्लॅटफॉर्म नव्या पिढीच्या नवोपक्रमाला सक्षम करत आहे. पुण्यातील कार्यक्रमातून याची प्रभावी झलक पाहायला मिळाली," असे NVIDIA दक्षिण आशियाचे हेड ऑफ कन्झ्युमर मार्केटिंग पवन अवस्थी यांनी सांगितले. कार्यक्रमात १७ वर्षांचा AI तज्ज्ञ आणि TEDx वक्ता राऊल जॉन अजू याने AI आणि गेमिंगच्या संयोजनावर विशेष कार्यशाळा घेतली. याशिवाय तीन AI-केंद्रित क्रिएटर्सनी प्रात्यक्षिक कार्यशाळांच्या माध्यमातून कंटेंट क्रिएशनच्या नव्या युगातील साधने आणि कार्यपद्धतींची माहिती दिली.

# जगबुडी पुलावरून कंटेनर नदीपात्रात कोसळला

■ खेड (दै. संध्या)

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खेड तालुक्यातील जगबुडी नदीच्या पुलावरून बुधवारी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास एक कंटेनर थेट नदीपात्रात कोसळल्याची धक्कादायक घटना घडली. या अपघातामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून पोलिस, महसूल प्रशासन आणि बचाव पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले आहे. प्राथमिक माहितीनुसार, कंटेनर पुलावरून नदीपात्रात कोसळला. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून त्याचा शोध घेतला जात आहे. कंटेनरमध्ये चालकासह आणखी इतर कोणी प्रवासी होते का, याचीही प्रशासनाकडून पडताळणी सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच खेड पोलिस, महसूल विभाग, आपत्कालीन यंत्रणा आणि बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली. नदीपात्रात कोसळलेल्या कंटेनरचा तसेच चालकाचा शोध युद्धपातळीवर सुरू असून आवश्यक यंत्रसामग्रीच्या सहाय्याने बचावकार्य राबविण्यात येत आहे. दरम्यान, घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केल्याने प्रशासनाने सुरक्षित अंतर राखण्याचे आवाहन केले आहे. या दुर्घटनेचा काही प्रमाणात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुकीवरही परिणाम झाला असून परिस्थितीवर प्रशासनाचे बारकाईने लक्ष आहे. बचावकार्य पूर्ण झाल्यानंतर आणि अधिकृत माहिती जाहीर झाल्यानंतरच अपघाताचे नेमके कारण तसेच जीवितहानीबाबत स्पष्ट माहिती समोर येणार आहे.






## पावसाचा जोर वाढला; आज-उद्या यलो अलर्टचा इशारा

■ रत्नागिरी : (दै. संध्या)

कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यात जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून पावसाचा जोर वाढला आहे. बुधवारी जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला होता. मध्यरात्री मुसळधार पावसाने हजेरी लावल्यानंतर सकाळीही विविध तालुक्यांत सर्वदूर पाऊस सुरू होता. गेल्या चोवीस तासांत जिल्ह्यात तब्बल ४३१.७८ मिमी पावसाची नोंद झाली असून नदी आणि धरणांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. गुरुवारपासून जिल्ह्याला यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जिल्ह्यात पावसाने दमदार हजेरी लावली होती. त्यानंतर काही दिवस पावसाने दडी मारली. आता वरुणराजाचे पुनरागमन झाले असून सलग चार दिवसांपासून पाऊस सुरू आहे. त्यामुळे भात लावणीच्या कामांना वेग आला आहे. बुधवारी सकाळी पावसाचा जोर होता. त्यानंतर काही काळ सूर्यदर्शन झाले. मात्र, सायंकाळनंतर पुन्हा पावसाचा जोर वाढला आणि रात्री मुसळधार पाऊस कोसळला. जिल्ह्यात १ जून ते २२ जुलै या कालावधीत सरासरी १ हजार ५६४ मिमी म्हणजेच ४६ टक्के पाऊस झाला आहे. गतवर्षी याच कालावधीत १ हजार ७१२ मिमी म्हणजे ५० टक्के पावसाची नोंद झाली होती. गतवर्षीच्या तुलनेत यंदा पावसाचे प्रमाण चार टक्क्यांनी कमी आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे नदी आणि धरणांच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत आहे.

## विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून विरोधकांचा केंद्रावर निशाणा : उदय सामंत

■ रत्नागिरी : (दै. संध्या)

दिल्लीतील जंतरमंतर येथे विद्यार्थ्यांचे सुरू असलेले आंदोलन आता राजकीय स्वार्थासाठी हायजॅक करण्यात आले आहे. विरोधक विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून केंद्र सरकारवर निशाणा साधत असल्याचा आरोप राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत केला. सामंत म्हणाले की, या आंदोलनात आता राहुल गांधी, अखिलेश यादव, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यासारखे प्रमुख विरोधी नेते सहभागी झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधातील पक्ष एकत्र येऊन या आंदोलनाचा वापर आपापल्या पक्षाला उभारी देण्यासाठी करत असल्याचा आरोप त्यांनी केला. विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमाराचे शिवसेना कोणत्याही परिस्थितीत समर्थन करत नाही. मात्र, समाजमाध्यमांवर प्रसारित झालेल्या चित्रफितींमधून अनेक बाबी समोर येत आहेत. पोलिसांनी आधी बळाचा वापर केला की आंदोलकांकडून पोलिसांवर हात उचलण्यात आला, याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असल्याचे सामंत यांनी सांगितले.

शिवसेना विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असल्याचा पुनरुच्चार सामंत यांनी केला. नीट परीक्षेतील गैरव्यवहाराची सखोल चौकशी झाली पाहिजे. प्रश्नपत्रिका फोडणाऱ्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे आणि विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान भरून निघाले पाहिजे, ही शिवसेनेची स्पष्ट भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घेतलेली भेट हा राजकीय सुसंस्कृतपणाचा भाग आहे. मात्र, इतर विरोधी पक्ष विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका सामंत यांनी केली. यावेळी त्यांनी विशेषतः उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेवर निशाणा साधला.

> सामंत यांनी पुनरुच्चार केला की, शिवसेना विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. नीट परीक्षेतील गैरव्यवहाराची सखोल चौकशी झाली पाहिजे, पेपर फोडणाऱ्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे आणि विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान भरून मिळाले पाहिजे, हीच शिवसेनेची स्पष्ट भूमिका आहे.

## जिल्ह्यात आज ऑरेंज; २३, २४ रोजी यलो अलर्ट

■ रत्नागिरी : (दै. संध्या)

रत्नागिरी जिल्ह्याला सलग तीन दिवस पावसाने चांगलेच झोडपून काढले आहे. दिवसा काही काळ पावसाची विश्रांती आणि मध्यरात्रीनंतर मुसळधार पाऊस, असे चित्र पाहायला मिळत आहे. गेल्या चोवीस तासांत जिल्ह्यात एकूण ३४८.८६ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. दरम्यान, जिल्ह्याला २२ जुलै रोजी ऑरेंज, तर २३ आणि २४ जुलै रोजी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस चिपळूण आणि खेड तालुक्यांत, तर सर्वात कमी पाऊस रत्नागिरी तालुक्यात नोंदवण्यात आला आहे. खेडमधील जगबुडी नदी अद्याप इशारा पातळीवर आहे. आणखी काही दिवस पावसाचा जोर कायम राहिल्यास जिल्ह्यातील नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता आहे. पावसामुळे शेतीच्या कामांनाही वेग आला असून भात लावणी आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. मंगळवारी दिवसभर कधी ऊन, तर कधी पावसाच्या सरी असे वातावरण होते.

## ठोस शासकीय धोरणाअभावी काजू उत्पादक संकटात

■ गुहागर : (दै. संध्या)

कोकणच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असलेले आंबा आणि काजू फलोत्पादन सध्या ठोस शासकीय धोरणाअभावी गंभीर संकटात सापडले आहे. निसर्गाचा लहरीपणा, दलालांची मक्तेदारी आणि दराची अनिश्चितता यामुळे हा व्यवसाय आता आतबट्ट्याचा झाला आहे. यावर मात करण्यासाठी केंद्र सरकारच्या पातळीवर स्वामीनाथन आयोगाच्या सूत्रानुसार हमीभाव (एमएसपी) मिळवण्यासाठी आक्रमक पाठपुरावा करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

राज्यात स्पष्ट फलोत्पादन धोरण नसल्याने आंबा व काजूच्या दरावर शासनाचे नियंत्रण नाही. हंगाम सुरू होताच व्यापारी आणि दलाल मनमानी पद्धतीने दर ठरवून शेतकऱ्यांची लूट करतात. आंबा नाशवंत माल असूनही कोकणात पुरेशी शासकीय शीतगृहे आणि प्रक्रिया उद्योग उपलब्ध नाहीत, ज्यामुळे बाजारात आवक वाढताच दर कोसळतात. तसेच फळपीक विमा योजनेचे जाचक निकष अवकाळी पाऊस व चक्रीवादळामुळे नुकसान होऊनही शेतकऱ्यांना मदत मिळू देत नाहीत. बागायतदारांना कायमस्वरूपी न्याय मिळवून देण्यासाठी राज्य शासन आणि लोकप्रतिनिधींनी केंद्रीय स्तरावर तातडीने पाठपुरावा करणे आवश्यक आहे. त्याकरिता बागायतदारांनी पाच महत्वाचे मुद्दे मांडले आहेत. यामध्ये काजूचा हमीभावाच्या यादीत समावेश करावा, 'कृषी मूल्य आणि किंमत आयोगाकडे' (सीएसीपी) यासाठी विशेष शिफारस करावी, भारतीय काजू बोर्डाची स्थापना करून कॉफी आणि टी बोर्डाप्रमाणेच स्वायत्त 'भारतीय काजू बोर्ड' स्थापन करून केंद्रीय नियंत्रण आणावे, बाजार हस्तक्षेप योजना (एमआयएस): नाशवंत पिकांसाठी हंगाम सुरू होण्यापूर्वीच दर निश्चित केले जावेत, अँटी-डम्पिंग ड्युटीः आफ्रिकी काजूवर केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने कडक 'सेफगार्ड ड्युटी' लावून किमान आयात मूल्य निश्चित करावे, भरारी पथकेः बनावट हापूसची विक्री रोखण्यासाठी केंद्रीय स्तरावर विशेष पथके नेमून दंडात्मक तरतुदी कराव्यात यांचा समावेश आहे. सध्या सरकार केवळ थेट खर्च व घरच्या मजुरीवर आधारित हमीभाव ठरवते, जो खूप कमी असतो. याउलट स्वामीनाथन आयोगाच्या सूत्रानुसार, बियाणे, खते किंवा मजुरीसोबतच शेतकऱ्याच्या स्वतःच्या जमिनीचे अंदाजीत भाडे आणि भांडवलावरील व्याज यांचाही अंतर्भाव सर्वसमावेशक खर्चात केला जातो.

## एटीएम कार्ड बदलून फसवणूक करणारा गुजरातचा सराईत भामटा गजाआड

■ रत्नागिरी : (दै. संध्या)

बँक ऑफ महाराष्ट्रचे नवीन एटीएम कार्ड ॲक्टिव्ह करण्यासाठी आलेल्या एका महिलेला बोलण्यात अडकवून, तिचे एटीएम कार्ड हातचलाखीने बदलून फसवणूक करणाऱ्या गुजरात येथील एका सराईत गुन्हेगाराला अवघ्या काही तासांत अटक करण्यात आली. रत्नागिरी शहर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने ही कारवाई केली. ही घटना मंगळवारी (दि.२१) सकाळी ११.३० च्या सुमारास घडली होती.

धीरजकुमार मोहनलाल पांचाळ (वय ४१, रा. सुरत, गुजरात) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून वेगवेगळ्या बँकांची एकूण ३४ एटीएम कार्डे जप्त करण्यात आली आहेत. मंगळवारी तक्रारदार महिला विश्वनगर, इंद्रधनु अपार्टमेंट येथील बँक ऑफ महाराष्ट्रच्या एटीएममध्ये आपले नवीन एटीएम कार्ड ॲक्टिव्ह करण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी तिथे आधीच उपस्थित असलेल्या आरोपीने "माझे पैसे निघत नाहीत, तुमचे निघतात का पाहूया" असे सांगून महिलेचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने हातचलाखी करून महिलेचा मोबाईल हातात घेऊन ओटीपी (OTP) जनरेट केला आणि कार्ड ॲक्टिव्ह करून दिले. मात्र, त्याच वेळी स्वतःजवळील दुसरेच एटीएम कार्ड महिलेला देऊन आणि "सर्व्हर डाऊन असल्याने कार्ड ॲक्टिव्ह होत नाही" असे सांगून तिला तेथून घालवून दिले.

## राजापूर रोड रेल्वे स्थानकातील प्रतीक्षालयाचे सिलिंग कोसळले

■ रत्नागिरी : (दै. संध्या)

कोकण रेल्वे मार्गावरील राजापूर रोड रेल्वे स्थानकातील प्रवासी प्रतीक्षालयाचे सिलिंग मंगळवारी रात्री सुमारे साडेनऊ वाजण्याच्या सुमारास अचानक कोसळल्याने एकच खळबळ उडाली. सुदैवाने त्याचवेळी मुंबईकडे जाणारी कोकणकन्या एक्स्प्रेस स्थानकात येणार असल्याने प्रतीक्षालयात थांबलेले सर्व प्रवासी प्लॅटफॉर्मवर गेले होते. त्यामुळे संभाव्य मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. काही क्षणांचा विलंब झाला असता तर सिलिंगखाली प्रवासी अडकून जीवितहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

घटना घडल्यानंतर स्थानक परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. सिलिंग कोसळल्याची माहिती मिळताच स्थानक प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. कोसळलेल्या भागाखाली कोणी अडकले आहे का, याची तत्काळ खातरजमा करण्यात आली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा दुखापत झाली नाही. मात्र, या प्रकारामुळे स्थानकाच्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत आणि देखभाल व्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राजापूर विभागातील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. कोसळलेले सिलिंग हटवून दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात आले.

# आंदोलन जाहीर होण्यापूर्वीच आरोग्य केंद्राला अडीच कोटी

■ रत्नागिरी (दै. संध्या)

तालुक्यातील एका प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी १५ दिवसांपूर्वीच २ कोटी ४६ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. असे असतानाही निधी मंजूर व्हावा, या मागणीसाठी काही जण आंदोलनाचे नाटक करत असल्याचा आरोप पालकमंत्री उदय सामंत यांनी केला. जिल्हा परिषदेवर काढण्यात येणाऱ्या कथित मोर्चाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी संबंधितांवर जोरदार टीका केली.

सोशल मीडियावर रील्सच्या माध्यमातून चुकीची माहिती पसरवून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करणाऱ्यांना प्रसिद्धी देणे थांबवले पाहिजे. अशा खोट्या प्रचाराला प्रशासनाने तातडीने खुलासा करून चोख उत्तर द्यावे, असे सामंत म्हणाले. प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी निधी मंजूर झाल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी संबंधितांना वेळेत



देणे आवश्यक होते. नागरिकांच्या मनातील शंका दूर करणे ही अधिकाऱ्यांचीही जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बुधवारी काढण्यात येणारा मोर्चा अखेर संबंधितांना रद्द करावा लागला. शिवसेना पदाधिकाऱ्यांनीही लोकांची दिशाभूल करणे थांबवावे, अशी भावना खंडाळा येथील शिवसेना विभागप्रमुखांनी व्यक्त केली. यावेळी पालकमंत्री सामंत यांनी पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवरही नाराजी व्यक्त केली. सरकार आणि मुख्यमंत्र्यांची बदनामी करणारे तसेच खोट्या मागण्यांसाठी मोर्चे काढणाऱ्या लोकांकडे पोलीस अधीक्षक क्रिकेट खेळण्यासाठी आणि चहा पिण्यासाठी जात असतील, तर त्यातून प्रशासनात योग्य संदेश जात नाही, असे ते म्हणाले. याबाबत दीड वर्षांपूर्वीच सूचना दिल्याचे सांगत, प्रशासनाविरोधात काम करणाऱ्यांकडे क्रिकेट खेळण्यासाठी जाताना पोलीस अधीक्षकांनी यापुढे काळजी घ्यावी, अशी पालकमंत्री म्हणून आपली स्पष्ट विनंती असल्याचे सामंत यांनी नमूद केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुणे महापालिकेच्या 'स्वच्छता अभियान सप्ताह'चा बोपोडी येथे शुभारंभ

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पुणे महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'स्वच्छता अभियान सप्ताह' उपक्रमाचा औंध क्षेत्रीय कार्यालयामार्फत बोपोडी येथे उत्साहात शुभारंभ करण्यात आला. सकाळी ७ वाजता आयोजित कार्यक्रमात पुणे महानगरपालिकेचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभियानाची सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रभाग समिती अध्यक्षा रोहिणी चिमटे, सन्माननीय सभासद बाबुराव चांदेरे, अमोल बालवडकर, सनी निम्हण, भक्ती गायकवाड तसेच औंध क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त विजय नायकल यांच्यासह अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते. अभियानाच्या शुभारंभानंतर उपस्थित लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी स्वतः झाडू हाती घेत परिसराची स्वच्छता केली. स्वच्छता ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचा संदेश देत नागरिकांनी शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. 'स्वच्छता अभियान सप्ताह' अंतर्गत शहरातील विविध भागांमध्ये स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येणार असून, नागरिकांचा व्यापक सहभाग मिळावा यासाठी पुणे महानगरपालिकेकडून विशेष नियोजन करण्यात आले आहे.



### बारामतीत आषाढी एकादशी विठ्ठल रुक्मिणी मंदिरात भक्तीमय वातावरणात साजरी

बारामती (दैनिक संध्या) : वणवेमळा (बारामती) येथील श्री विठ्ठल मंदिरात देवशयनी आषाढी एकादशी भक्तीमय वातावरणात व विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली.जनहित प्रतिष्ठानच्या शाळेतील विद्यार्थ्यांची दिंडी व विद्यार्थ्यांचे इतर कार्यक्रमांचे आयोजन मंदिरात करण्यात आले होते. उपवासानिमित्त सर्वांना फळे व फराळाचे वाटप करण्यात आले.याप्रसंगी वणवे सहपरिवार,श्रीकांत जाधव,सोमेश कल्याणकर,विकास (बाबुशेठ) किकले,प्रमोद बुलबुले,गुळवे सर,सुनिल शर्मा,शुभम भंडारे यांनी परिश्रम घेवून विठ्ठल मंदिरातील आषाढी एकादशीचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात व मोठ्या उत्साहात साजरा केला.

### केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा, राजे ग्रुपतर्फे मेलडी वाटून जल्लोष

नारायणगाव (दैनिक संध्या) : केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर राजे ग्रुप महाराष्ट्र राज्य या सामाजिक संस्थेच्या वतीने नारायणगाव येथे आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी कार्यकर्ते, विद्यार्थी व ग्रामस्थांच्या उपस्थितीत फटाके फोडून तसेच मेलोडी चॉकलेटचे वाटप करून आनंद व्यक्त करण्यात आला. यावेळी बोलताना उपस्थितांनी सांगितले की, सोनम वांगचूक यांच्या २६ दिवसांच्या उपोषणाला, CJP च्या सुमारे ४५ दिवस चाललेल्या आंदोलनाला आणि देशभरातून वाढलेल्या जनसमर्थनामुळे सरकारला अखेर हा निर्णय घ्यावा लागला, अशी त्यांची भावना आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने लढा देणाऱ्या सर्व आंदोलनकर्त्यांचे त्यांनी अभिनंदन केले. उपस्थितांनी शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता, परीक्षा प्रक्रियेत विश्वासार्हता आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षाही व्यक्त केली. भविष्यात विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी आणि सामाजिक प्रश्नांवर राजे ग्रुप महाराष्ट्र राज्य सातत्याने जनजागृती व लोकशाही मार्गाने आंदोलन करत राहील, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा दर्शवत एकजुटीचा संदेश दिला. यावेळी राजे ग्रुपचे अध्यक्ष जुबेर शेख, उपाध्यक्ष प्रसाद हिंगे, कार्याध्यक्ष गौतम औटी, सचिव विजय घेगडे, ग्रामपंचायत सदस्य जुबेर आतार, नागेश्वारी केदार, आराध्या वाव्हळ, वैभव भूमकर, जफर शेख, सकलेन आतार, अमन इनामदार, गिरीराज वाव्हळ, मनोज वर्मा, योगेश लोखंडे, पंकज भालेराव, मयूर भोईटे, मुन्ना पठाण आदी कार्यकर्ते, विद्यार्थी, व ग्रामस्थ उपस्थित होते.

## अतिवृष्टीने शेतीचे मोठे नुकसान

**नारायणगाव (दै. संध्या)**

जुन्नर तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून कोसळणाऱ्या संततधार पावसामुळे येथील शेती व्यवसाय पूर्णपणे संकटात सापडला आहे. सततच्या पावसामुळे शेतातील कामे पूर्णपणे ठप्प झाली असून, शेतात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आहे. या अतिवृष्टीमुळे मुख्यत्वे भाजीपाला आणि खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले असून, शेतकऱ्यांचे संपूर्ण आर्थिक गणित कोलमडले आहे. सतत ओलसर आणि दमट वातावरणामुळे पिकांवर विविध बुरशीजन्य आणि विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव वेगाने वाढत आहे. जुन्नर तालुक्यातील चिल्हेवाडी, पाचघर आणि इतर परिसरातील टोमॅटो पिकाचे सर्वात जास्त नुकसान झाले आहे. शेतात पाणी साचल्याने झाडांना लागलेले टोमॅटो सडू लागले आहेत, तर काही ठिकाणी झाडे कोलमडून पडली आहेत. टोमॅटो काढणी करताना निम्म्याहून अधिक पिकावर काळे डाग पडल्याचे समोर येत आहे. यामुळे तोडलेला टोमॅटो बाजारात नेण्याऐवजी शेतातच फेकून देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.टोमॅटोसह मेथी, कोथिंबीर, भेंडी, दुधी भोपळा, गवार , पावटा, चवळी, तोंडली आणि इतर पालेभाज्यांची पिकेही सडून नष्ट झाली आहेत.रोगांच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना महागड्या कीटकनाशकांची आणि बुरशीनाशकांची फवारणी करावी लागत आहे. यामुळे आधीच कर्जबाजारी असलेल्या शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात प्रचंड वाढ झाली आहे.

## आषाढी एकादशी निमित्ताने सासवडला संत सोपानदेव मंदिरात विविध कार्यक्रम संपन्न

**सासवड (दै. संध्या)**

आषाढी एकादशी च्या निमित्त सासवड येथे संत सोपानदेव मंदिरात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सासवडसह अनेक भागातून भाविकांनी समाधी दर्शनाला दिवसभर गर्दी केली होती. आज (शनिवार ) देवशयनी अर्थात आषाढ एकादशी असल्यामुळे भल्या सकाळी मंदिरात अभिषेक महापूजा व अन्य धार्मिक विधी पार पडले, सकाळी ११ वाजता पंचक्रोशीतील वारकऱ्यांनी हरिपाठ दुपारी भाविकांकडून उपस्थितांना भगरभात देण्यात आला



दुपारच्या सत्रात हभप शंकरमहाराज पोमण यांचे पोथी वाचन व हभप झेंडे महाराज यांचे प्रवचन मंदिरात पार पडले. विकास जगताप यांच्याकडून खिचडी व फळे तसेच सोपानकाका बँकेच्या वतीने भाविकांना गुडदाणी व केळी वाटप करण्यात आले. सायंकाळी वीणा मंडपात हभप अभयमहाराज जगताप यांचे "सुंदर ते ध्यान उभे विटेवरी " या अभंगावर सुश्राव्य कीर्तन रंगले. रात्री मंदिरात



एक दिंडी प्रदक्षिणा होऊन या सोहळ्याची सांगता झाली.

## एकादशीनिमित्त पुरातन विसावा विठ्ठल मंदिरात भाविकांची गर्दी

**सासवड (दै. संध्या)**

देवशयनी म्हणजेच आषाढी एकादशी निमित्ताने शनिवारी (दि २५ जुलै) सासवड येथील क-हे काठच्या पुरातन " विसावा विठ्ठल " मंदिरात भाविकांनी सकाळपासूनच दर्शनासाठी गर्दी केली होती. संत सोपानकाका महाराजांनी संजीवन समाधी घेतेवेळी प्रत्यक्ष श्री पांडुरंग येथे आले होते.

त्यावेळी कऱ्हे काठी विश्रांतीसाठी थांबले होते, त्या ठिकाणी मंदिर बांधले व विठ्ठलानी विश्रांती घेतली म्हणून विसावा विठ्ठल असे नाव मंदिरास मिळाले अशी आख्यायिका सांगितली जाते एकादशीनिमित्त श्री विठ्ठल





रुक्मिणी पुरंदरे ट्रस्ट तर्फे

पहाटे ६ वाजता महाअभिषेक, महापूजा महाआरती करण्यात आली. प्रवीण खळदकर यांनी पौरोहित्य केले यतीन पुरंदरे व सौ अर्चना पुरंदरे, किरण पुरंदरे या प्रसंगी उपस्थित होते. सकाळी नऊ ते अकरा या काळात अमोल बेलसरे, प्रशांत चिवटे वीणा बागडे, मल्हार बागडे व पुरंदर कला मंचच्या सदस्यांनी भक्ती गीते सादर केली. दुपारच्या सत्रात त्रिवेणी महिला भजनी मंडळाच्या ३५ महिलांनी विठ्ठल पंचपदी सादर केली.

सायंकाळी नामदीप महिला भजनी मंडळाचा भजन कार्यक्रम संपन्न झाला तर सायंकाळी उशिराने महाआरती करण्यात आली.

मंदिरात भाविकांना रोटरी क्लब, शुभम अनिल जगताप, सोपानकाका बँक यांच्या वतीने गुडदाणी वाटप केल्याची माहिती ट्रस्टचे किरण पुरंदरे व नाना पुरंदरे यांनी दिली. दिवसभरात हजारो भाविकांनी विठ्ठल दर्शनाचा लाभ घेतला.

## गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानाची भेट

**नारायणगाव (दै. संध्या)**

ग्रामीण भागातील होतकरू आणि गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने 'बॉर्डरलेस फाउंडेशन'च्या वतीने आणे-माळशेज परिसरात एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या थेट घरी जाऊन त्यांचा प्रमाणपत्र व आर्थिक मदत देऊन विशेष सन्मान करण्यात आला. या अनोख्या उपक्रमामुळे विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले



असून, परिसरात या कौतुकास्पद उपक्रमाची मोठी चर्चा आहे.

कोणताही गाजावाजा न करता विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला. बॉर्डरलेस फाउंडेशनने अत्यंत यशस्वीपणे ही अभिनव संकल्पना राबविली. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यासोबतच त्यांची शिक्षणाविषयीची आणि सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ झाली आहे.

## आषाढी एकादशीनिमित्त श्री लकडी पूल विठ्ठल मंदिरात महाआरोग्य व महा रक्तदान शिबिर

**पुणे (दै. संध्या)**

- १०० हून अधिक रक्तदात्यांचा सहभाग
- पळस टीका गावातील अनाथ विद्यार्थ्यांना देवस्थानातर्फे शालेय साहित्याचे वाटप

आषाढी एकादशीनिमित्त श्री लकडी पूल विठ्ठल मंदिर ट्रस्ट व लायन्स क्लब ऑफ पुणे सिटी, लायन्स क्लब पुणे कोथरूड आणि लायन्स क्लब पुणे धनकवडी यांच्या संयुक्त विद्यमाने भाविकांसाठी महाआरोग्य शिबिर तसेच महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्‌घाटन लायन्स इंटरनॅशनलचे गव्हर्नर श्रेयस दीक्षित यांच्या हस्ते झाले. या उपक्रमात १०० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले, तर २०० ते २५० नागरिकांची विविध आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी श्री लकडी पूल विठ्ठल मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष दिलीप बांदल, कोषाध्यक्ष दीपक थोरात, सचिव नरेंद्र गाजरे, सहसचिव बाळासाहेब ताठे, विश्वस्त महेश अंबिके व स्वप्नील काळभोर तसेच मंदिराचे कर्मचारी उपस्थित होते. लायन्स क्लब पुणे सिटीचे अध्यक्ष दीपक थोरात, खजिनदार बजरंग आकडे, लायन्स क्लब पुणे कोथरूडचे अध्यक्ष गुणेश साने आणि लायन्स क्लब पुणे धनकवडीचे अध्यक्ष भानुदास पायगुडे यांनीही कार्यक्रमात सहभाग घेतला. यावेळी देवस्थानातर्फे घोलप ब्लड बँकेला हिमोग्राम तपासणी मशीन भेट देण्यात आले. तसेच ब्लड बँकेच्या वतीने माजी गव्हर्नर अभय शास्त्री यांच्या हस्ते देवस्थानचा सत्कार करण्यात आला. याशिवाय मंचर-भीमाशंकर रोडवरील पळस टीका गावातील सह्याद्री बालगृहातील अनाथ विद्यार्थ्यांना देवस्थानातर्फे शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. दीपक थोरात म्हणाले, आषाढी एकादशीनिमित्त दरवर्षी देवस्थानाच्या वतीने शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरण या तीन क्षेत्रांत सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असून, भविष्यातही हे कार्य अधिक व्यापक स्वरूपात सुरू राहणार आहे.

## नीट परीक्षा घोटाळा व सोनम वांगचूक यांच्यावरील कारवाईविरोधात बारामतीत काँग्रेस आक्रमक

## काळे झेंडे दाखवत निषेध; तहसीलदारांमार्फत राष्ट्रपतींना निवेदन

**पुणे (दै. संध्या)**

बारामती : नीट-यूजी परीक्षेतील कथित प्रश्नपत्रिका फूट प्रकरण आणि दिल्लीतील जंतर-मंतर येथे शांततापूर्ण मार्गाने उपोषण करणारे सोनम वांगचूक यांच्यावरील केंद्र सरकारच्या कथित दडपशाहीच्या निषेधार्थ बारामती तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी काळे झेंडे दाखवत केंद्र सरकारचा निषेध करण्यात आला. तसेच बारामती तहसीलदारांमार्फत राष्ट्रपतींना विविध मागण्यांचे निवेदन पाठविण्यात आले. निवेदनात केंद्र सरकारच्या धोरणांवर तसेच परीक्षा व्यवस्थेतील गोंधळावर काँग्रेसने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नीट-यूजी परीक्षेतील कथित घोटाळा हा देशातील लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि त्यांच्या मेहनतीशी केलेला खेळ असल्याचा आरोप काँग्रेस



**काँग्रेसच्या प्रमुख मागण्या**

- नीट-यूजी परीक्षा प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा.
- परीक्षा पद्धतीत आमूलाग्र बदल करून संपूर्ण पारदर्शकता आणावी.
- सोनम वांगचूक यांच्यासारख्या नागरिकांचा आवाज दडपण्याचे प्रकार केंद्र सरकारने तात्काळ थांबवावेत.

पदाधिकाऱ्यांनी केला. परीक्षा पद्धतीमध्ये संपूर्ण पारदर्शकता आणून या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

दिल्लीतील जंतर-मंतर येथे आपल्या मागण्यांसाठी शांततापूर्ण मार्गाने उपोषणाला बसलेल्या सोनम वांगचूक यांना केंद्र सरकारने राजकीय आकसातून आणि बळाचा वापर करून आंदोलनस्थळावरून हटविल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. हा प्रकार लोकशाहीची गळचेपी करणारा आणि नागरिकांचा आवाज दडपणारा असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे.

पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष लहू निवांगुणे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी काळे झेंडे दाखवत निषेध नोंदविला. देशातील लोकशाही व्यवस्था आणि विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी राष्ट्रपतींनी आपल्या घटनात्मक अधिकारांचा वापर करून केंद्र सरकारला योग्य ते निर्देश द्यावेत, अशी विनंती निवेदनातून करण्यात आली.

बारामती शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष वीरधवल गाडे, बारामती तालुका अध्यक्ष वैभव बुरुंगले, शहराध्यक्ष सुशांत सोनवणे, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव सौरभ रुपनवर यांच्यासह काँग्रेसचे विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## समाजाच्या उन्नतीसाठी प्रत्येकाने खारीचा वाटा उचलावा

### श्रीनिवास कानडे यांचे मत; वंचित विकास संस्थेतर्फे 'विलास चाफेकर स्मृती पुरस्कार' प्रदान

**पुणे (दै. संध्या)**

- आषाढीनिमित्त आयोजित 'करावा विठ्ठल' कार्यक्रमाने प्रेक्षकांना दिला भक्तिरसाचा आनंद



एका बाजूला भारत झपाट्याने प्रगती करत असला, तरी दुसऱ्या बाजूला समाजातील अनेक घटक मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. या वंचित घटकांना मदतीचा हात देऊन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी प्रत्येकाने आपल्या परीने खारीचा वाटा उचलणे आवश्यक असल्याचे मत कल्याणी ग्लोबल इंजिनिअरिंगचे कार्यकारी संचालक श्रीनिवास कानडे यांनी व्यक्त केले.

वंचित विकास संस्थेतर्फे संस्थापक दिवंगत विलास चाफेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा यंदाचा 'विलास चाफेकर स्मृती पुरस्कार' कानडे यांना प्रदान करण्यात आला. बीएमसीसी कॅम्पसमधील सायरस पुनावाला ऑडिटोरियम येथे झालेल्या समारंभात संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार मर्लेचा, कार्यवाह व संचालक मीना कुर्लेकर, संचालक सुनीता जोगळेकर, सौ. कानडे आदी उपस्थित होते. आषाढी एकादशीच्या निमित्ताने आयोजित 'करावा विठ्ठल' या सांस्कृतिक कार्यक्रमानेही उपस्थितांना भक्तिरसाचा अनोखा अनुभव दिला.

श्रीनिवास कानडे म्हणाले, "वंचित विकास संस्थेशी माझे अनेक वर्षांपासून जिव्हाळ्याचे नाते आहे. दिवंगत विलास चाफेकर सरांचे सामाजिक कार्य मला जवळून पाहण्याची संधी मिळाली. विशेषतः 'नीहार' प्रकल्पातून त्यांनी केलेले विधायक कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांच्याकडून प्रेरणा घेत आम्ही गरवारे महाविद्यालयातील मित्रपरिवाराच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम सुरू केले. गेल्या पंधरा वर्षांपासून विविध सामाजिक संस्थांना सहकार्य करण्याचा आणि समाजोपयोगी कार्यात योगदान देण्याचा प्रयत्न करत आहोत."

मीना कुर्लेकर म्हणाल्या, समाजातील वंचित घटकांच्या उन्नतीसाठी दिवंगत विलास चाफेकर यांनी केलेल्या कार्याचा गौरव करत त्यांच्या सामाजिक विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याच्या उद्देशाने हा पुरस्कार दरवर्षी प्रदान केला जातो. वंचित विकास संस्थेने समाजातील विविध घटकांसाठी जवळपास चार दशकांहून अधिक काळ योगदान दिले आहे. डॉ. श्रीकांत गबाले यांनी सूत्रसंचालन केले. अक्षय कुर्लेकर यांनी स्वागत प्रास्ताविक केले. तृप्ती फाटक यांनी आभार मानले.

पुरस्कार वितरणानंतर आकार पुणे निर्मित 'करावा विठ्ठल' या आगळ्यावेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. महेश पाटणकर यांच्या संकल्पना, लेखन आणि संगीत दिग्दर्शनाखाली साकारलेल्या या प्रयोगात पंढरपूरच्या वारीचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक प्रवास संगीत, नाट्य आणि अभंगांच्या माध्यमातून उलगडला. या कार्यक्रमाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विठ्ठलनामाच्या गजराने आणि भक्तिमय सादरीकरणाने संपूर्ण सभागृह भारावून गेले. स्वपाली गाडे, रश्मी फोगले, सविता घारे, स्वाती रांजेकर, अनाहिता रांजेकर, स्वरदा गोसावी, सुनील सोमे, धनंजय वैष्णव, महेश पाटणकर आणि सिद्धा पाटणकर यांच्यासह कलाकारांनी प्रभावी अभिनय आणि सुरेल सादरीकरणातून वारीचा अनुभव रसिकांसमोर जिवंत केला.

## सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हजतर्फे आयोजित रक्तदान शिबिरात १०२ पिशव्यांचे संकलन

**पुणे (दै. संध्या)**

सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हजतर्फे व्हीके ग्रुपच्या वर्धापनदिनानिमित्त दीनानाथ मंगेशकर रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला कर्मचारी, स्वयंसेवक तसेच विविध संस्थांतील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. व्हीके ग्रुपच्या कार्यालयात आयोजित शिबिरात १०२ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकीची जाणीव जपली. यावेळी नगरसेवक पुनीत जोशी, सामाजिक कार्यकर्ते शिवराज सुतार, विश्वास कुलकर्णी, अपूर्वा कुलकर्णी, डॉ. पूर्वा केसकर, विजय साने आणि उपेंद्र देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमाचा समन्वय अमोल उंबरजे, मेघना पिंगळे, प्रियांका बुरंगे, सुमित कापसे, हर्षित गेहलोट, वैशाली आठवले, एचआर स्मिता आणि विदुला फडके यांनी केला. या शिबिरामध्ये व्हीके ग्रुप, श्रुडकॉम, मुथा असोसिएट्स तसेच इतर



विविध संस्थांतील कर्मचारी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. यावेळी दीनानाथ मंगेशकर रक्तपेढीच्या डॉ. अभिप्सा श्रोत्रीया, प्रिया चव्हाण आणि प्रतीक कल्याणकर उपस्थित होते. समाजात स्वेच्छा रक्तदानाविषयी जनजागृती निर्माण करणे, नियमित रक्तदानाची सवय रुजविणे आणि 'रक्तदान हीच सर्वोच्च मानवसेवा' हा संदेश जनमानसात रुजविण्याचे उल्लेखनीय कार्य सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हज करीत असल्याचे सांगत पुनीत जोशी आणि शिवराज सुतार यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. रक्तदान हे केवळ दान नसून, एखाद्या अनोळखी व्यक्तीला नवजीवन देण्याची संधी आहे. अपघातग्रस्त, गंभीर रुग्ण, शस्त्रक्रिया, थॅलेसेमिया तसेच कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी रक्ताची सातत्याने आवश्यकता भासत असते. त्यामुळे समाजात स्वेच्छा रक्तदानाची चळवळ अधिक बळकट व्हावी, या उद्देशाने सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हजतर्फे दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते, असे संस्थेच्या विश्वस्त अपूर्वा कुलकर्णी यांनी सांगितले. सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हज आणि व्हीके ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान उपक्रमांमधून आजपर्यंत ३८५ हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करून अनेक रुग्णांना जीवनदान देण्याच्या कार्यात मोलाचे योगदान दिले आहे.